# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २१, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६६**

---

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाणे/भिवंडी बायपास परिसरातील रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१)** * **४७४५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा ७०१ कि.मी. मार्ग दिनांक ५ जून, २०२५ पासून पूर्ण क्षमतेने वाहतुकीसाठी उपलब्ध झाला असून नागपूर–मुंबई अंतराचा प्रवासकाल सरासरी ६-७ तासांवर आला असताना ठाणे बायपास तसेच भिवंडी बायपास परिसरातील (ठाणे–वडपे/माजीवाडा पट्टा धरून) रस्त्यांच्या अपूर्ण कामांमुळे केवळ ३० किमी अंतराच्या प्रवासासाठी दररोज २ तासांपर्यंत प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे बायपास व भिवंडी बायपास परिसरातील ठाणे– समृद्धी महामार्गाकडे येणाऱ्या दीर्घ पल्ल्याच्या वाहनांसाठी ठाणे–भिवंडी बायपास मार्गांवर तात्पुरते ट्रॅफिक मॅनेजमेंट लागू करणे तसेच पोलिस/एमएसआरडीसी/एमएमआरडीए संयुक्त नियंत्रण कक्ष कार्यान्वित करणे इ. वाहनधारकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन करित असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, ठाणे–वडपे/माजीवाडा महामार्ग १२-लेन विस्तार, उड्डाणपुल/अंडरपासेस, सेवाजवळचे रॅम्प्स, रो-रो/डायव्हर्जन्स यांसह प्रलंबित कामे कोणती आहेत, सदर कामांची पॅकेज-निहाय स्थिती काय आहे व सुधारित पूर्णता-कालमर्यादा काय ठेवली आहे,

(४) असल्यास, समृद्धी महामार्गाला थेट ठाण्याशी जोडणाऱ्या आमणे-साकेत उन्नत मार्गाच्या २९ कि.मी. लांबीच्या प्रकल्प अहवालामध्ये (DPR), निधी, भू-अधिग्रहण, पर्यावरण/CRZ मंजुरी, निविदा याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, ठाणे/भिवंडी बायपासवरील अपूर्णावस्थेतील कामांमुळे वेळेच्या व इंधनाच्या अपव्ययाचा शासकीय अंदाज, अपघात-जोखीम व आपत्कालीन प्रतिसादासाठी केलेल्या अतिरिक्त तरतुदी, तसेच कंत्राटी विलंबांवर दंडात्मक तरतुदी करुन अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.८४८ (जुना रा.म.क्र.३) वरील ठाणे ते वडपे या महामार्गाच्या लांबीचे काम राष्ट्रीय महामार्ग राजमार्ग प्राधिकरण यांचे सवलतदार म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर लांबीमध्ये सद्य:स्थितीत ४ मोठे पूल, ४ छोटे पूल, व ४ भुयारी मार्गाचे काम प्रगतीत असून महामार्गावरील होणारी प्रचंड वाहतूक वर्दळ भुयारी मार्गाच्या ठिकाणी असलेल्या सेवा रस्त्यावर वळवण्यात आल्यामुळे कशेडी पूलाच्या ठिकाणी अस्तित्वातील २+२ लेनच्या पुला लगत ४+४ लेनचा पूलाचे काम प्रगतीत असल्यामुळे व वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस विभागाकडून मुंबई/ठाणे च्या दिशेने जाणारी अवजड वाहने थांबविण्यात आल्यानंतर एकाच वेळी सोडण्यात येत असल्यामुळे ठराविक वेळेत वाहतूक कोंडी होत आहे. इतर वेळी वडपे ते माजिवाडा दरम्यानचा प्रवास वेळ ४० ते ४५ मिनिटांचा आहे.

(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून वडपे – ठाणे महामार्गावर वाहतूक व्यवस्थापनेसाठी वाहतूक पोलीस विभागाला १९७ वार्डन व ०९ क्रेन देण्यात आले आहेत. व या महामार्गाची दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

(३) वडपे ठाणे मुख्य रस्ता व सेवा रस्त्याचे काम सुमारे ८०%, वडपे उड्डाणपूल, रेल्वे पूल, कशेडी खाडीपूल व कळवा खाडीपूल यांचे अनुक्रमे ८०%, ६८%, ९०%, ९६% काम पूर्ण झाले आहे. तसेच ४ छोटे पुलाचे ९३% व १० भुयारी मार्गापैकी ६ भुयारी मार्गाचे काम पूर्ण होऊन उर्वरित ४ भुयारी मार्गाचे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्प माहे मार्च,२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) नगरविकास विभागाच्या अहवालानुसार समृध्दी महामार्गावरील थेट ठाण्याशी जोडण्याऱ्या आमणे-साकेत या २१.८० कि.मी. लांबीच्या उन्नत मार्गासाठी दिनांक २३/०७/२०२४ रोजी नेमणूक करण्यात आलेल्या सल्लागाराकडून या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झालेला आहे व त्यास MMRDA ने मान्यता दिली आहे. तद्अनुषंगाने भू-अधिग्रहण, पर्यावरण/CRZ मंजुरी, निविदा याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) महामंडळाने करारनाम्यातील तरतूदीनुसार प्रकल्प बांधकामादरम्यान येणारे विविध अडथळे/समस्या अंर्तभूत करून या कामास दिनांक ०३/०३/२०२६ पर्यंत मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव केंद्रशासनाचे NHAI यांचेकडे मंजुरीसाठी सादर केला आहे. त्यानुसार कामाचे बाबनिहाय नियोजन केले असून सदरील काम दिलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी येथून जाणाऱ्या शिवडी जोडरस्त्याच्या कामास गती मिळणेबाबत

**(२)** * **४६६२ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी गाव येथील एन. हर्डीकर मार्गावरून सुरू करण्यात आलेल्या आणि वरळी सेंच्युरी बाजार येथील डॉ. ॲनी बेझंट मार्गाला छेदून जाणाऱ्या शिवडी जोडरस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यावर वरळी आणि शिवडी दरम्यानचा प्रवास जलद व सोपा होईल तसेच वरळी ते अटल सेतू दरम्यानच्या प्रवासाच्या वेळेत मोठी बचत होईल, त्याकरीता वरळी-शिवडी उन्नत मार्ग जलदगतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत होत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू जोडरस्त्यामुळे परिसरातील अनेक इमारती बाधित होत असून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न देखील प्रलंबित राहिला आहे, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू जोडरस्त्यांच्या कामास गती देण्याबाबत, तसेच बाधित इमारतीतील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नारायण हर्डीकर मार्गावरील शिवडी–वरळी उन्नत प्रकल्पाचे सुमारे ९०% काम पूर्ण झालेले आहे. तसेच या मार्गावरील रॅम्पचे काम वगळता पुलासाठी आवश्यक असलेली सर्व बॅरिकेट्स काढून टाकण्यात आलेली आहेत. बांधकामाच्या सुरुवातीच्या कालावधीत काही प्रमाणात वाहतुकीत अडथळा निर्माण झाला असला, तरी सध्या वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व तात्पुरती उपाययोजना करण्यात आलेली आहे आणि उर्वरित कामे देखील नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच एलफिन्स्टन येथील पुलाचे पाडकाम तसेच द्विस्तरीय बांधकाम हे काम या प्रकल्पाचा भाग असल्याने सदर परिसरातील जगन्नाथ भाटनकर मार्ग हा बंद करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार सदर रस्ता दि. १२ सप्टेंबर, २०२५ पासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

वरळी-शिवडी दरम्यान वाहतुकीकरीता लगतच्या परिसरातील उपलब्ध दक्षिणेकडील करी रोड ब्रिज व उत्तरेकडील टिळक ब्रीज वरुन वाहतुकीचा पर्यायी मार्ग उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रवाशांच्या माहितीकरीता व वाहतुकीचे सुयोग्य नियमन करण्यासाठी दिशादर्शक सुचना फलक तसेच ट्राफिक वार्डन यांची व्यवस्था करण्यात आली आहे.
(२) शिवडी–वरळी उन्नत मार्गाच्या एकूण कामापैकी सुमारे ६२% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम हे शिवडी रेल्वे स्टेशनजवळील प्रकल्प बाधित लोकांच्या तसेच एलफिन्स्टन परिसरातील प्रकल्प बाधित लोकांच्या पुनर्वसन प्रक्रियेच्या कारणामुळे विलंबित झाले होते. तसेच, एलफिन्स्टन येथे अस्तित्वात असलेल्या पुलाच्या पाडकामासाठी रस्ता बंद करण्यास संबंधित विभागाची परवानगी प्राप्त होण्यास विलंब झाला. तथापि, दि. १२ सप्टेंबर, २०२५ पासून रस्ता बंद करण्यात आला असून जुन्या पुलाचे पाडकाम सध्या प्रगतीपथावर आहे.

आता, सुधारित बांधकामाच्या संरचनेनुसार प्रकल्पाचे उर्वरित काम दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वरळी आणि शिवडी दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सुलभ होईल तसेच वरळी ते अटल सेतू प्रवास वेळेत बचत होण्यास मदत होईल.
(३) व (४) वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पामध्ये एलफिस्टन ब्रिज येथील प्राथमिक सर्वेक्षणानुसार एकूण १९ इमारती बाधित होत होत्या. तथापि, दरम्यानच्या काळामध्ये वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पाच्या आखणी मार्गामध्ये बदल झाल्यामुळे १९ इमारतींपैकी फक्त लक्ष्मी निवास व हाजी नुरानी चाळ या २

इमारती बाधित होत आहेत.

तसेच ८३ कुटुंब बाधित होत असून त्यापैकी ३ कुटुंबांना त्यांच्या मागणीनुसार आर्थिक मोबदला देण्यात आला आहे. प्रकल्पाने बाधित होत असलेल्या इतर प्रकल्पबाधितांचे त्याच परिसरातील म्हाडाकडून एमएमआरडीएकडे प्राप्त होणाऱ्या सदनिकांमध्ये पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित असून म्हाडामार्फत उक्त सदनिकांची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाकडून प्रगतीपथावर आहे.

-----------------

## पिंपरी चिंचवड शहरातील इमारतींवर अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात येत असल्याबाबत

**(३)** * **५५३७ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील ३९० निवासी आणि बिगर निवासी मोठ्या इमारतींच्या गच्चीवर विविध मोबाईल कंपन्यांचे अनधिकृतपणे मोबाईल टॉवर उभारले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत मोबाईल टॉवर उभारलेल्या कंपनीच्या थकबाकी वसुलीकडे महानगरपालिकेचे कर आकारणी व कर संकलन विभाग वर्षानुवर्षे दुर्लक्ष करित असल्याने या ठिकाणी नियुक्त असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मानधनातून या कर आकारणीची वसुली करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कोट्यवधीहून अधिक रकमेच्या थकबाकीची वसूली प्रलंबित असून हौसिंग सोसायटीच्या मोबाईल टॉवरला विरोध असताना देखील महानगरपालिकेचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत टॉवर उभारणाऱ्या कंपन्यांवर व त्यास दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मालमत्ता कर थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांची कर वसुली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार करणेत येते. तथापि, केंद्र शासनाने नवीन दूरसंचार कायदा २०२३, दिनांक २६/०६/२०२४ पासून व Right of Way (Row) नियम २०२४, दिनांक ०१/०१/२०२५ पासून अंमलात आणला असून सदर कायदा राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायतींना राज्य शासनाने दिनांक ०५/०२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये लागू केला आहे. सदर कायद्यातील कलम १४ (३) मध्ये मोबाईल टॉवरचा समावेश मालमत्ता करामध्ये करता येणार नाही असे नमूद केले आहे. तसेच कलम १४ (४) नुसार केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही मोबाईल टॉवरवर कारवाई करता येणार नाही. माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राधिकृत अधिकारी म्हणून प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांची नियुक्ती केली आहे. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांच्या परवानगी शिवाय कोणतीही कारवाई करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४) * ४७०३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या सुमारे १ हजार पुनर्वसित इमारती मोडकळीस आल्या असून अशा इमारतींमध्ये रहिवाशी जीव मुठीत घेऊन वास्तव्यास असल्यामुळे या पुनर्वसित इमारतींचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून पुनर्विकास करण्याचा निर्णय नवीन गृहनिर्माण धोरणांतर्गत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती योग्य देखभाल-दुरुस्ती न झाल्याने वा इतर कारणांमुळे मोडकळीस आल्या आहेत, यास्तव अशा इमारतींतील रहिवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन नवीन गृहनिर्माण धोरणात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत धोकादायक व मोडकळीस आलेल्या पुनर्वसित इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत किती झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे व उक्त इमारतीतील रहिवाशांना पुनर्विकासांतर्गत किती चौ.फुटांची घरे देण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, नवीन गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्वसन घटकातील ज्या इमारती धोकादायक झालेल्या आहेत अशा इमारतींच्या पुनर्विकास करण्याबाबतची तरतूद शासनाने दिनांक २३ जुलै, २०२५ रोजीच्या गृहनिर्माण धोरणात केलेली आहे.

(२), (३) व (४) सदर धोरणाच्या अनुषंगाने DCPR-२०३४ मधील अधिनियमात आवश्यक दुरुस्ती/तरतूदी करण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक कर्मचाऱ्यांनी बोगस जात प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी व पदोन्नती मिळविल्याबाबत

**(५) * ५३९९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात अनेक कर्मचाऱ्यांनी बोगस जात प्रमाणपत्रांचा आधार घेऊन नोकरी व पदोन्नती मिळविल्याबाबतची तक्रार शिक्षण विभागात प्रहार शिक्षक संघटनेचे अध्यक्ष यांनी माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांची जात पडताळणी प्रमाणपत्रांची तपासणी केली आहे काय, बोगस प्रमाणपत्र सादर करुन आरक्षणाचा लाभ मिळवून नोकरी व पदोन्नती घेणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात ३७० प्रशिक्षित शिक्षकांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने संबंधित जात वैधता पडताळणी समितीमार्फत करण्याबाबत महानगरपालिका स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील अतिदक्षता विभागासाठी डॉक्टर व बालरोग तज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत

**(६) * ५६९३ श्री.योगेश टिळेकर, श्री.अमित गोरखे, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सर्व साधन सामुग्री असतानाही मनुष्यबळाचा अभाव असल्याने बालरुग्णांना उपचारापासून वंचित राहावे लागत असून, डॉक्टरांची कमतरता असल्याने बालरुग्णांना पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचार न करता ससून रुग्णालयात पाठविण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालरोग अतिदक्षता विभागाची सोय असूनही मनुष्यबळाच्या अभावामुळे ससून रुग्णालयावर ताण येत असून रुग्णालयांतील बालरुग्णांची गर्दी कमी करण्यासाठी कमला नेहरु रुग्णालयामध्ये बालरोग अतिदक्षता विभाग सुरू करून बालरुग्णांवर शक्य तेवढे उपचार करण्याचे आवाहन करणारे पत्र ससून रुग्णालयाच्या बालरोग विभागाकडून पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुन कमला नेहरु रुग्णालयात बाल अतिदक्षता विभाग उभारण्यात आला, परंतु बालरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे विभागातील उपलब्ध साधन सामुग्री यांचे लेखापरिक्षण करण्याची आवश्यकता असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकाराची गंभीरतेने नोंद घेऊन कमला नेहरु रुग्णालयातील बाल अतिदक्षता विभागासाठी आवश्यक डॉक्टर, बालरोग तज्ज्ञ यांची तात्काळ नियुक्ती करुन आणि बालरुग्ण सेवा तातडीने सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयामध्ये ज्या सुविधा उपलब्ध नाहीत अशा बाल रुग्णांना पुढील उपचाराकरीता ससून रुग्णालयात संदर्भित करण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) कमला नेहरु रुग्णालयाकडील अतिदक्षता विभागाकडील वर्ग-१ व वर्ग-२ चे प्रत्येकी एक बालरोग तज्ञ व भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाकडील १ प्राध्यापक, १ सहयोगी प्राध्यापक, १ व्याख्याता व प्रत्येकी १ वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डॉक्टर इतके मनुष्यबळ उपलब्ध आहे. उपलब्ध मनुष्यबळामार्फत आलेल्या बालकांवर उपचार करण्यात येत आहेत.

पुणे महानगरपालिकेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या शिवभोजन थाळी व आनंदाचा शिधा योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(७) * ४८२४ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सचिन अहिर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसामान्य जनतेला सण-उत्सव आनंदात साजरे करता यावेत म्हणून राज्य शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या "आनंदाचा शिधा" योजनेंतर्गत रेशन दुकानात दिवाळीत १०० रुपयांत आनंदाचा शिधा म्हणून अन्नधान्यांच्या किटचे वाटप करण्यात येत होते, परंतु यंदाच्या दिवाळीत आनंदाचा शिधा वितरित करण्यात आला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरिबांसाठी सुरु केलेली शिवभोजन थाळी या योजनेंतर्गत गरीब व श्रमिक वर्गासाठी फक्त १० रुपयांत पुरविण्यात येते, शासनाकडून ७० कोटीं रुपयांच्या अनुदानांपैकी २८ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्याचे आदेश अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आले असून उर्वरित ४२ कोटी रुपयांच्या अनुदानाचे वितरण करून सामान्य व अल्पभूधारक जनतेला स्वस्त दरात भोजनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, "आनंदाचा शिधा" व शिवभोजन थाळी या निधीअभावी बंद पडलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीत आर्थिक मंजुरी, पुरवठा प्रक्रिया किंवा प्रशासकीय विलंबामुळे उद्भवलेल्या समस्यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच 'आनंदाचा शिधा' ही योजना गरीब व गरजू नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने ती नियमितपणे सुरु राहण्यासाठी अनुदानाचे तातडीने वितरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शिवभोजन योजनेंतर्गत गरीब व गरजू व्यक्तींना सवलतीच्या दरात शिवभोजन थाळी विनाखंड उपलब्ध व्हावी याकरीता वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता एकूण रक्कम रुपये ७०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०२५ अन्वये रक्कम रुपये २१.०० कोटी, शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२५ अन्वये रक्कम रुपये २१.०० कोटी असा एकूण रुपये ४२,००,००,०००/- इतका निधी माहे एप्रिल, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीत व शासन निर्णय दिनांक ०७/११/२०२५ अन्वये उर्वरित निधी रक्कम रुपये २८.०० कोटी उपनियंत्रक शिधावाटप कार्यालये तसेच

सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर खर्चास उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) व (४) शिवभोजन थाळी ही योजना बंद पडलेली नसून, सदर योजनेकरीता उपनियंत्रक शिधावाटप कार्यालये तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयांना वरीलप्रमाणे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. माहे डिसेंबर, २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात शिवभोजन थाळी योजनेकरीता रक्कम रुपये १९७.९१ कोटीची पुरवणी मागणी वित्त विभागास सादर करण्यात आली आहे. "आनंदाचा शिधा" कार्यक्रम ही नियमित योजना नसुन विविध सणांचे औचित्य साधुन त्या-त्या वेळी मंत्रीमंडळाच्या मान्यतेने "आनंदाचा शिधा" वितरीत करण्यात येतो. तथापि, राज्यातील पात्र लाभार्थ्यांना विविध सणांनिमित्त "आनंदाचा शिधा" चे वितरण करण्याबाबत शासन प्रयत्नशिल आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सार्वजनिक बांधकाम मंडळात ई-निविदा न काढताच निवडक कंत्राटदारांना कोट्यवधींची कामे दिल्याबाबत

**(८) * ४८३० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १९४ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सार्वजनिक बांधकाम मंडळातील तत्कालीन अधीक्षक अभियंता यांनी अधिकार नसताना हेतुपरस्पर ई-निविदा प्रक्रिया डावलून निवडक कंत्राटदारांच्या माध्यमातून रुपये ५० कोटीहून अधिक रकमेची कामे मंजूर करुन गैरव्यवहार केल्याने मुख्य अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करणे अपेक्षित असताना अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडून सविस्तर छाननी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह अहवाल अद्याप अप्राप्त असून त्यादृष्टीने शासन करीत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, नवी मुंबई यांनी आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, व सदर अहवाल शासनास कधीपर्यंत सादर होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्या अहवालानुसार तक्रारीत अंशत: तथ्य आढळून येत असल्याने, सा.बां.विभागाच्या दिनांक ०८/०६/२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्दचे परिपूर्ण दोषारोपपत्रं आवश्यक त्या कागदपत्रांसह व संपूर्ण सेवातपशीलासह सादर करणेबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. दोषारोप

पुनर्विलोकन समितीकडून शासनास दोषारोपपत्रे प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) * ५७२२ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील वाटूर फाटा ते देवगांव फाटा दरम्यान केंधळी येथील पुलाची दुरवस्था झाली असून त्या ठिकाणी वाहनाच्या अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, या पुलावर बसचे तसेच चारचाकी व दुचाकीचे अनेकवेळा अपघात होत असून या अपघातांमध्ये ५० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन रस्ता करताना या पुलाला डागडुजी करुन नंतर त्याची रक्कम वाढविण्यात आली असून, या कामामध्ये संबंधित अधिकारी व संबंधित कंत्राटदारांमार्फत मोठ्या प्रमाणात कोट्यवधी रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंठा (जि.जालना) तालुक्यातील मंठा ते अंभोडा तसेच मंठा ते उस्वद तसेच मंठा ते खुर्द पांगरी ते माळकीणी या दुरवस्था झालेल्या रस्त्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी मिळत नसून या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे जिल्हा परिषद प्रशासन जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने या रस्त्याला जोडणाऱ्या अनेक गांवे व पाड्यामधील नागरिकांना व विद्यार्थ्यांना रस्ता बंद झाल्याने प्रचंड गैरसोय होत असून १५० पेक्षा जास्त विद्यार्थीनींना त्यांच्या शाळेत जाता येत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याच्या रुंदीकरणासह सुधारणा करण्यासाठी निधी मंजूर करुन उक्त रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील वाटूर फाटा ते देवगाव फाटा रा.म.क्र. ७५२-आय वरील केंधळी येथील पूलाचे काम जुलै, २०२३ मध्ये सा. बां. विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत पूर्ण करण्यात आले असून त्यामध्ये अस्तित्वातील १२ मी. रुंदीच्या पूलाचे रुंदीकरण करून १८ मी. रुंदीचा पूल बांधण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत पूल सुस्थितीत आहे. पोलीस विभागाच्या अहवालामध्ये केंधळी येथील पूलाच्या दुरावस्थेमुळे अपघात झाल्याची नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

वाटुर ते चारठाणा रा.म.क्र. ७५२- आय या महामार्गाच्या दर्जोन्नतीच्या कामामध्ये केंधळी येथील अस्तित्वातील पुलाच्या रुंदीकरणाचे काम अंतर्भूत होते. तसेच अस्तित्वातील पुलाच्या मजबुतीकरणाचे (Jacketting) अतिरिक्त काम आवश्यकतेनुसार करण्यात आले आहे.

(३) व (४) मंठा ते उस्वद हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १३ असा वर्गीकृत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. प्रस्तुत रस्त्यावरील खड्डे वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत भरून

रस्ता सुस्थितीत ठेवलेला आहे. मंठा ते अंभोडा व मंठा ते पांगिरी (खुर्द) ते माळकिणी हे दोन्हीही रस्ते इजिमा दर्जाचे असून जिल्हा परिषद जालनाकडे देखभाल दुरुस्तीसाठी आहेत. जिल्हा परिषदेमार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई तसेच नागपूर शहरातील नागरिकांवर**
**भटक्या श्वानांच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत**

**(१०) * ४६८४ श्री.सुनिल शिंदे, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करत असल्याचा दावा करीत असली तरीदेखील मुंबईतील भटक्या श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे तसेच नागपूर शहरात भटक्या श्वानांचे नागरिकांवरील हल्ल्यांचे प्रकार देखील वाढत असून माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून नागपूर जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात माहे जानेवारी, २०२५ ते माहे सप्टेंबर, २०२५ पर्यंत श्वानांनी किती नागरिक व बालकांवर हल्ला केला आहे, त्याची वर्गवारी करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात ४० लाख भटक्या श्वानांची संख्या असून सद्य:स्थितीत मुंबईत सुमारे ९१ हजाराच्या आसपास भटक्या श्वान असून गत वर्षभरात १ लाख ३५ हजार २५३ मुंबईकरांवर भटक्या श्वानांनी चावा घेतला असल्याची बाब दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शहरातील भटक्या श्वानांमुळे नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होऊन भितीचे वातावरण निर्माण झाले असून याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप त्यावर कोणतीही उपाययोजना किंवा या श्वानांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२३ मध्ये ३० व्यक्तींचा मृत्यू रेबीज आजारामुळे झाल्याची माहिती उपलब्ध असून सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांना खाऊ घातल्यास कारवाई करण्याचे तसेच भटक्या श्वानांची नसबंदी व लसीकरण करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये दिले असून सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(५) असल्यास, भटक्या मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने भटक्या श्वानांसाठी सुविधाजन्य निवारा केंद्र उभारण्याबाबत व श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाने (ॲनिमल वेलफेर बोर्ड) विहित केलेल्या कार्यपद्ध्तीनुसार हुमन सोसायटी इंटरनॅशनल या जागतिक संस्थेमार्फत भटक्या श्वानांचे सन २०१४ मधील सर्वेक्षणानुसार ९५,१७२ श्वान तसेच सन २०२४ मधील पुनसर्वेक्षणानुसार ९०,७५७ इतके श्वानांची नोंद घेण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिका क्षेत्रात ९४२७ नागरीकांना श्वानदंश झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०२४ मध्ये महानगरपालिकेकडील उपलब्ध नोंदीनुसार १,२८,२५२ नागरीकांना श्वानदंश झाला आहे.

(३) हे खरे नाही.

१) प्राणी प्रजनन नियंत्रण नियमावली, २०२३ अन्वये निर्गमित केलेल्या नियमानुसार भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण करणे, श्वानांची वाढती संख्या मर्यादित ठेवणे, रेबीज निर्मुलन करणे, मनुष्य-कुत्रा संघर्ष टाळणे या उपाययोजना राबविण्यात येत आहे. २) नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणेसंदर्भात स्वतंत्रपणे वेबपोर्टल तयार करण्यात आलेले आहे. ३) स्वतंत्रपणे हेल्पलाईन क्रमांक (७५६४९७६६४९) प्रसिध्द करण्यात आलेला आहे. ४) जनजागृतीसाठी WVS-Mission Rabies या संस्थेसोबत करार करण्यात आलेला असून त्यानुसार सन २०२४ पासून जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. ५) पाळीव श्वानांना अनुज्ञाप्ती देण्यात येत आहे. ६) मा.न्यायालयाने व जीव जंतू कल्याण मंडळ यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येत आहे.

(४) व (५) माहे ऑगस्ट, २०२५ मध्य मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आक्रमक श्वान व रेबीज रोगाची लागण झालेल्या भटक्या श्वानांना श्वानगृहात ठेवणे व श्वानांना खाऊ घालण्याची ठिकाणे निश्चित करण्यासंदर्भात महानगरपालिकेच्या स्तरावर विभागनिहाय कृतीदल स्थापन कार्यवाही सुरू आहे. मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मोकाट श्वानांसाठी सुविधाजन्य निवारे बनविण्यासाठी प्रत्येक वाढीव जागेसाठी शोध घेण्यात येत आहे. तसेच, सदर प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, उपनगरे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या अखत्यारित असलेल्या मोकळया जागा शोधण्यासाठी शोध समितीची स्थापना करण्यात आली आहे. श्वान निवारागृहे स्थापन करण्याबाबत भारतीय जीव जंतू मंडळाच्या दिनांक २७/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत श्वान नसबंदी योजनेत वरिष्ठ लिपिक यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(११)** * **५२०७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या श्वान नसबंदी कार्यक्रमात वरिष्ठ लिपिक यांनी आर्थिक गैरव्यवहार, बनावट देयके, नियमभंग करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वरिष्ठ लिपिक यांनी श्वानांचे ऑपरेशन करतानाचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसताना कोट्यवधी रकमेची देयके काढून निधीचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी माहिती अधिकारात दिलेल्या नियुक्ती पत्रानुसार तीन डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येऊन हजेरी पत्रकात फक्त एका डॉक्टराची उपस्थिती दाखविण्यात येणे तसेच सदर वैद्यकीय तज्ज्ञ महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या संस्थेमध्ये काम करुन दोन्हीकडून वेतन घेत असून ज्या कामासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे ते काम न करता सदर वरिष्ठ लिपिक इतर वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संगनमत करुन महानगरपालिकेची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दररोज ४० ते ५० श्वानांची नसबंदी ऑपरेशन एकाच डॉक्टराने केल्याचे दाखवून केलेल्या गैरव्यवहाराची शासनाने दखल घेऊन संबंधित दोषींवर तसेच संबंधित कंत्राटदार संस्था व अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करुन संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

सबंधित कर्मचारी हे 'वरिष्ठ लिपिक' नसून, (एम.पी.डब्ल्यु) बहुऊद्देशिय कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. दिनांक २४/१०/२०२५ रोजी प्राप्त तक्रार अर्जानंतर सदर प्रकरणी प्रशासनाने गांभिर्याने दखल घेत सबंधित कार्यरत संस्थेला तसेच संबंधित कर्मचारी यांना नोटीस बजावून त्यांचा खुलासा मागविण्यात आला. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता, संस्थेच्या कामात अनियमितता असल्याचे दिसून येत असल्याने संस्थेला काळया यादीत टाकणे व संस्थेची पुढील प्रलंबित देयके अदा न करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, संबंधित (एम.पी.डब्ल्यु) बहुऊद्देशिय कर्मचारी श्री.कमलेश सोनावणे यांना संस्थेच्या दैनदिन कामकाजावर पर्यवेक्षण करणे तसेच देयके तपासून सादर करणे साठी आदेश देण्यात आले होते. तथापि, त्यांना नेमून दिलेल्या कामामध्ये दुर्लक्ष केल्यास कामकाजातील गैरवर्तन आणि अक्षम्य निष्काळजीपणा याबाबत जबाबदार धरुन त्यांना आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या आदेशान्वये दिनांक २६/११/२०२५ रोजीपासून निलंबित करण्यात आलेले आहे. याप्रकरणी सबंधित कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे.
(२) संस्थेची देयके अदायगी करताना संस्थेने देयकासोबत सादर केलेली रजिस्टरची प्रत, व्हिडीओ तपासून देयकांची अदायगी करण्यात येते. संस्थेने शस्त्रक्रिया करतानाचे व्हिडीओ देयकांसोबत सादर केलेले आहेत. तत्पूर्वी सबंधित कर्मचारी यांनी व्हिडीओ तपासून देयके अदायगी करणे अपेक्षीत होते.

तथापि, सदर कामामध्ये दुर्लक्ष केल्यामुळे त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. संस्थेची माहे एप्रिल, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीतील देयके अदायगी करण्यात आलेली नाहीत. याप्रकरणी सबंधित कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे.
(३) सदर श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यासाठी मे. जीवरक्षा ॲनिमल वेल फेअर ट्रस्ट पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी, यांची नियुक्ती मे.एम के फॅसिलीटी सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेमार्फत करण्यात आली आहे. महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सदर

पशुवैद्यकीय अधिकारी यांचे नाव मे. जीवरक्षा ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट, पुणे यांच्या हजेरीपटावर दिसून येत आहे. तथापी, दोन्हीकडून वेतन घेत असल्याबाबत पुरावे चौकशीमध्ये आढळून आले नाहीत. तसेच सदर कर्मचारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संगनमत करून महानगरपालिकेची फसवणूक करत आहेत हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी जिवरक्षा ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट, पुणे यांना जा.क्र/३२०२, दिनांक १६/१०/२०२५ अन्वये खुलासा करणेबाबतचे पत्र पाठविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने सदर संस्थेचा खुलासा ई-मेल व्दारे दिनांक २७/१०/२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे. सबब संस्थेने केलेला खुलासा नामंजूर करण्यात येवून सदर संस्थेच्या कामात अनियमितता असल्याचे दिसून येत असल्याने संस्थेला काळ्या यादीत टाकणे व संस्थेची पुढील प्रलंबित देयके अदा न करण्याबाबतचा निर्णय झाला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट कफ सिरपच्या वापर व विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(१२) * ४९३९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय केणेकर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.संदीप जोशी, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.अमोल मिटकरी, श्री.योगेश टिळेकर, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यप्रदेश, राजस्थानमध्ये कफ सिरपमुळे २० बालकांच्या मृत्यूंच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत शासकीय, निमशासकीय रुग्णालयातून औषधांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी केली असता, राज्यातील काही शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक स्तरावर खरेदी केलेली औषधे बोगस असून औषधांच्या नमुन्यामध्ये मूळ घटकच नसल्याचे निष्पन्न झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ई-निविदा काढून शासकीय, निमशासकीय रुग्णालयांना औषधांचा पुरवठा केला असून, सदर प्रक्रीयेमध्ये बोगस औषधांचा पुरवठा राज्यातीलच नव्हे तर परराज्यांतील काही कंपन्या व स्थानिक विक्रेत्यांमार्फत करण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने लहान बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने 'कोल्ड्रिफ' औषधाचा वापर तातडीने थांबविण्याचे निर्देश देऊनही काही ऑनलाईन पोर्टलवर पोल्ट्री जननी या नावाने सुरु असलेली विक्री तातडीने न थांबवण्याची कारणे काय आहेत, तसेच नागपुर येथील खोकल्यावरील औषधांचे नमुने संकलित करून तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या औषधांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास उक्त अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करत असतानाच ऑनलाईन औषधांवर ही निर्बंध लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी पुरवठा केलेल्या औषधी नुमन्यांच्या विश्लेषणाअंती अहवालातून ते बनावट असल्याचे स्पष्ट झाल्याचे पत्र आरोग्य संचालकांना दिले असून बोगस औषधांचा पुरवठा करून बालकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या दोषी कंपन्यांविरुध्द कोणती दंडात्मक व फौजदारी कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर प्रक्रीयेंतर्गत बोगस औषधांची खरेदी कोणत्या जिल्ह्यांतील कोणत्या रुग्णालयांमार्फत करण्यात आली, संबंधित बोगस औषधे पुरविणाऱ्या कंपन्यांची नावे काय आहेत, कोणत्या कंपन्यांचे व किरकोळ विक्रेत्यांचे किती व कोणकोणत्या औषधांचे नमूने दोषपूर्ण / बनावट आढळून आले आहेत, तसेच या तपासणीमध्ये कोणकोणत्या आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या असून त्याचा तपशील काय आहे,
(६) असल्यास, मुंबईतील काही भागात प्रिस्क्रिप्शनशिवायही औषधे मिळत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यातील अन्न व औषध प्रशासनाने कफ सिरपची विक्री करणाऱ्या मेडिकलच्या तपासणीसाठी १ लाख दुकानांपैंकी फक्त ५५५ मेडिकलची तपासणी करण्यात आली असून त्यापैंकी २३४ मेडिकलसना प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरपची औषधे विक्री केल्याप्रकरणी नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर बनावट औषधांच्या धोक्याबाबत पालकांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यासाठी, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय खोकल्याच्या औषधांची विक्री न करण्यासाठी तसेच बनावट औषधे विक्रेता/वापरावर नियंत्रण आणण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कोणती कारवाई व प्रतिबंधात्मक उपाययोजना (FDA) राबविण्यात आल्या आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

आरोग्य विभागातील औषध खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणामार्फत करण्यात येते व सदर औषधांची NABL मार्फत तपासणी करण्यात येते.

तथापि, अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत शासकीय, निमशासकीय रुग्णालयातून औषधांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी केली जाते, सदर तपासणी दरम्यान मागील वर्षी माहे- जुलै-२०२४ ते मार्च-२०२५ दरम्यान राज्यातील ११ आरोग्य संस्थांकडून स्थानिक स्तरावर खरेदी केलेली औषधे बनावट असल्याचे निष्पन्न झाले होते. सदर बनावट औषधांचा पुरवठा राज्यातीलच नव्हे तर परराज्यातील काही कंपन्या व स्थानिक विक्रेत्यांमार्फत करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली होती. सदर प्रकरणी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याअंतर्गत ०४ न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.
(३) Sresan Pharma या तामिळनाडू येथील स्थित उत्पादकाकडून COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या औषधाचा पुरवठा मध्यप्रदेश राज्यात करण्यात आला होता. सदर औषधामुळे मध्यप्रदेश राज्यातील बाधित मुले नागपूर येथे उपचारासाठी दाखल झाली होती. तद्नंतर मध्य प्रदेशमधील सदर मुलांचा दूषित कफ सिरप या औषधाचे सेवन केल्यामुळे मृत्यू झाला होता. त्यानुसार, अन्न व औषध प्रशासनाकडून खबरदारी म्हणून कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक एसआर -१३ च्या अनुषंगाने दिनांक ०५/१०/२०२५ व दिनांक ०७/१०/२०२५ रोजी Public Alert जारी करून सदर औषधाचा वापर व विक्री न करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देश ऑनलाईन औषध विक्रीलाही लागू आहेत.

औषधांची विक्री व वितरण औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ नुसार नियंत्रित केले जाते.

सदर कायद्यामध्ये औषध विक्रेत्यांसाठी परवाने व परवाना अटी यांचा स्पष्ट उल्लेख आहे. औषधांची ऑफलाईन किंवा ऑनलाईन विक्री सदर कायद्यातील नियमांअंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार होणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या औषधाचा पुरवठा झाला नसल्याचे औषध नियंत्रक, तामिळनाडू यांच्याकडून स्पष्ट झाले होते. तथापि, औषध निरीक्षकांद्वारा सदर औषध राज्यात उपलब्ध आहे किंवा कसे, याबाबत पडताळणी करण्यात आली असून सदर पडताळणीमध्ये उक्त औषध राज्यात वितरीत झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

तसेच, या प्रकरणी नागपुर विभागातून खोकल्यावरील औषधांचे एकूण २७ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून त्याचे अहवाल प्रलंबित आहेत.

(४) व (५) अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत माहे- जुलै-२०२४ ते मार्च-२०२५ दरम्यान केलेल्या तपासणीमध्ये १.रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय, आंबेजोगाई, बीड
२.जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड
३.ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर, नागपूर
४.जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा
५.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर
६.आय.जी.एम. रुग्णालय, भिवंडी, ठाणे
७.जिल्हा परिषद रुग्णालय, ठाणे
८.जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे
९.जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड
१०.जिल्हा सामान्य रुग्णालय, धाराशिव
११.शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या ११ आरोग्य संस्थांनी खरेदी केलेले औषध बनावट असल्याचे निष्पन्न झाले होते. या सर्व बनावट औषधांच्या पुरवठ्यांमध्ये खालील औषध उत्पादक सहभागी होते:-१. M/s. Mrystal Formulation, Uttarakhand,
२. M/s. Biotech Formulations, Mellore
३. M/s. Refant Pharma Ltd., Kerala,
४. M/s. Stefan Formulations, Uttarakhand
५. M/s. Mellown Bioscineces. Kerala
६. M/s. Skycure Solutions, Kerla
७. M/s SMN Labs. Limited, Uttarakhand
८. M/s. Sreeg Labs, Uttarakhand

तसेच, खालील औषध विक्रेते सहभागी होते:-१ मे. जया इंटरप्राजेस, लातूर
२. मे. विशाल इंटरप्राजेस. कोल्हापूर
३. मे. ॲक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा. लि., भिंवडी, जि.ठाणे

४. में. कॅबिज जेनेरीक हाऊस, मिरा रोड, जि.ठाणे
५. मे. ग्लाशिअर फार्मा प्रा. लि., अमरावती
६. में राजेश फार्मा प्रा. लि., अमरावती
७. मे. मिल्टन जनरिक प्रा. लि., कालबादेवी रोड, मुंबई
८. मे. श्री गणेश फार्मा एन्ड सर्जिकल एल.एल.पी., मिरारोड, ठाणे.
९. मे, प्रतिमा फार्मास्युटिकल्स, शिक्रापूर, पुणे

या प्रकरणी पुढील नमुद औषधांचे नमुने दोषपूर्ण/ बनावट आढळून आले आहेत:- Azimcin ५००, Bifo CV-६२५ Tab, Recip ५०० Tab, Reclav-६२५ Tablets, Formox २५० Tab, MFmox-LB-६२५ Tab, Remox २५० Cap, Meclav-६२५ Tab, Moxmad २५० Cap, Curexim-२००, Albendazole ४०० mg, Pracet-m, Ronnin ५००mg, Fluconazole १५०mg, Pratimol ६५०, Pratlo-HZ, Procin २५०mg, Azinav-५००mg, Vromox-५००mg, Felox – IB.

या प्रकरणी संबंधित आरोपींना अटक करण्यात आली असून सदर प्रकरणी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याअंतर्गत ०४ न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच, बनावट औषधांच्या पुरवठ्याबाबत अप्रमाणित/कमी गुणवत्तेच्या औषध पुरवठादार कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, काही पुरवठादारांचे सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) जप्त करण्यात आलेली आहे.

या प्रकरणाबाबत आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी त्यांच्या दिनांक ०४/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आरोग्य संचालक यांना कळविले आहे. तथापि, सदर प्रकरणी बनावट कफ सीरपचे औषध असल्याचे आढळून आले नव्हते.

(६) बृहन्मुंबई विभागात ९७ औषध विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या असून ३८ प्रकरणी विनाप्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरफची औषधे विक्री करण्यात आलेल्या पेढयांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, राज्यात विशेष मोहीम राबवून एकूण ५३८ किरकोळ विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी २३५ पेढ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या असून एकूण १९५ किरकोळ विक्री पेढ्यांना विक्री बंद आदेश देण्यात आले आहेत.

(७) अन्न व औषध प्रशासनाकडून कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक एसआर -१३ च्या अनुषंगाने दिनांक ०५/१०/२०२५ व दिनांक ०७/१०/२०२५ रोजी Public Alert जारी करून सदर औषधाचा वापर व विक्री न करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यात उत्पादित होत असलेल्या कफ सिरप व त्यासाठी वापरण्यात येणारे liquid excipient यांचा दर्जा पडताळण्यासाठी तपासणी मोहीम राबविण्यात आली आहे. त्यानुसार, ७९ उत्पादकांच्या तपासण्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यामध्ये उत्पादकांद्वारा औद्योगिक दर्जाचे liquid excipients वापरले जात नसून ते फार्माकोपियल दर्जाचे वापरले जात असल्याचे आढळून आले. इतर त्रुटींसाठी ०९ उत्पादकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. उत्पादकांकडून एकूण ३२ नमुने चाचणीसाठी घेण्यात आले आहेत.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा कोषागार अधिकारी आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(१३) * ५८१६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा कोषागार अधिकारी हे आपल्या पदाचा कार्यभार सांभाळत असताना पदाचा दुरुपयोग करून अनेकदा जिल्ह्यातील अधिकारी/कर्मचारी यांना नाहक त्रास देत असल्याचे तसेच जिल्हा परिषद, चंद्रपूर येथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी हेदेखील त्यांच्या वागणुकीमुळे व कार्यपध्दतीमुळे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अन्य कर्मचारी यांना त्रास देत असून याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा कोषागार अधिकारी हे माहे मार्च, २०२४ पासून जिल्हा कोषागारातील इमारतीच्या विश्रामगृहातच राहत असून मासिक वेतनातून घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता उचल करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद, चंद्रपूर येथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सतत उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अन्य कर्मचारी यांच्याकडे येणाऱ्या - जाणाऱ्या व्यक्तींकडे सी.सी.टी.व्ही. कॅमेराच्या माध्यमातून लक्ष ठेवून असतात, त्यांच्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत अनेक तक्रारी होऊन देखील त्यांच्यावर कोणतीही कारवाई न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, पदाचा दुरुपयोग करून शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या चंद्रपूर जिल्हा कोषागार अधिकारी यांची व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या अनियमिततेची चौकशी करुन शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार अर्ज दिले आहेत.

(२) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून मार्च, २०२४ ते जुन, २०२५ या कालावधीकरीता घरभाडे भत्ता रुपये १,०५,८७५/- व मार्च, २०२४ ते ऑक्टोबर, २०२५ या कालावधीकरीता प्रवास भत्ता रुपये ५३,९०३/- या अतिप्रदान रकमा त्यांच्या वेतनातुन वसूल करून शासन जमा केल्या आहेत. म.ना.से. (शि. व अ.) नियम, १९७९ नुसार चौकशी सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) जिल्हा परिषद, चंद्रपुर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याविरुध्दच्या तक्रारीनुसार शासनाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर या पदावरुन कार्यमुक्त करुन सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचे कार्यालयात हजर होण्याचे आदेश दिले होते.

सदर शासन आदेशाविरुध्द त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज क्र. १०२०/२०२५ दाखल केला आहे. त्यावर १३/१०/२०२५ रोजीच्या सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर यांच्याविरूध्द म.ना.से. (शि. व अ.) नियम, १९७९ नुसार चौकशी सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद, चंद्रपूर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या बदलीचा विषय न्यायप्रविष्ट आहे. तसेच लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रार अर्जांच्या अनूषंगाने दोषारोप अंतिम करून म.ना.से. (शि. व अ.) नियम, १९७९ नुसार चौकशी सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबादेवी मंदिर परिसराचा विकास करण्याबाबत

**(१४) * ५११० श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजैनमधील महाकाल मंदिराच्या धर्तीवर मुंबईतील सिद्धिविनायक, महालक्ष्मी आणि मुंबादेवी मंदिर परिसराचा विकास करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला असून महालक्ष्मी मंदिराच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाली असून सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या विकासकामांसाठी नुकतीच निविदा जारी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबादेवी मंदिर परिसराच्या विकासाला अपुरा प्रकल्प निधी तसेच इतर आसपासची आरक्षणे व वाहतूक कोंडीमुळे अडथळे येत असून, मुंबादेवी मंदिर परिसराच्या विकासकामांसाठी अद्याप निविदाही जारी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबादेवी मंदिर परिसराच्या विकासाला गती देण्याच्या दृष्टीने व निविदा जारी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

मुंबादेवी मंदिर परिसराचा विकास प्रकल्पाचा आराखडा सध्या अस्तित्त्वात असलेल्या आरक्षणाच्या चौकटीत राहुन अंतिम करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास मुंबई वारसा संवर्धन समितीची 'ना-हरकत' प्राप्त आहे. सदर विकास प्रकल्पाच्या अंदाजपत्रकाचे काम अंतिम टप्प्यात असून महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरीने निधी उपलब्ध करुन प्रकल्पाच्या कामाची 'ई-निविदा' काढण्याची प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांच्या १०० मीटरच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस बंदी घालण्याबाबत

**(१५) * ५६४७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांच्या १०० मीटरच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि सेवन करण्यास कायद्याने बंदी असतानाही राज्यातील बहुतांशी शाळांच्या आजुबाजूच्या १०० मीटरच्या आतील परिसरात गुटखा, पान मसाला, तंबाखू, सिगारेट यांची सर्रास विक्री होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीसंदर्भात शाळेच्या १०० मीटर परिसराच्या मर्यादेचा कायदा / नियम लागू करताना त्यातील पळवाटेचा सोईस्कररित्या वापर करून शाळांच्या १०० मीटरचे हे अंतर शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून मोजण्यात येते त्यामुळे शाळेच्या डाव्या, उजव्या व मागील बाजूस असलेल्या पान टपऱ्यांना संबंधित पालिका व पोलीस प्रशासन अधिकाऱ्यांकडून उघडपणे हेतु: पुरस्सपरपणे संरक्षण देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळेपासून १०० मीटर अंतराचा हा नियम / कायदा शाळेच्या एकूण परिसरापासूनच्या चारीबाजुंकरीता ग्राह्य धरून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीवर बंदी आणि व्यापार आणि वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरणाचे नियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६(ब) अन्वये कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या शंभर यार्ड त्रिज्येच्या परिसरात सिगारेट किंवा इतर तंबाखूजन्य पदार्थाची विक्री, विक्रीसाठी देवू करणे किंवा विक्री करण्याची परवानगी नाही. कलम ६ (अ) व ६ (ब) अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जोडपत्र ॥ मधील नमूद १२ यंत्रणांना (प्राधिकृत अधिकारी) देण्यात आलेले आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व शैक्षणिक संस्थामध्ये तंबाखूमुक्त शाळा धोरण-२०२० राबविण्यात आले आहे. त्यानुसार, तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करणारी कोणतेही दुकान शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात नसावे, शैक्षणिक संस्थेच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थ वापराचा कोणताही पुरावा असू नये व शैक्षणिक संस्थेच्या बाहय भिंतीपासून १०० यार्ड क्षेत्र रेखाकिंत केले गेले असावे. या नियमांचा भग झाल्यास राष्ट्रीय क्वीट लाइन (Quit line) या हेल्पलाईन वर तक्रार करावी व यासंदर्भात दंड लादण्याचा अधिकार त्या शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांना असेल. अशा पदार्थांची विक्री थांबिवण्यासाठी व्यवस्थापन समितीने स्थानिक प्रशासन व पालकांच्या सहाय्याने प्रयत्न करावेत, असे नमुद केले आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात माहे ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) कायदा, २००३ चे कलम ४ अंतर्गत ९३ प्रकरणी ९३ व्यक्तींविरुध्द कारवाई करून रुपये १६,३५०/- दंड आकारण्यात आला आहे, कलम ६ (अ) अंतर्गत १८ प्रकरणी १८ व्यक्तींविरुध्द कारवाई करून रुपये ३६००/- दंड आकारण्यात आला आहे, तसेच कलम ६ (ब) अंतर्गत ०३ प्रकरणी ०३ व्यक्तींविरुध्द कारवाई करून रुपये ६००/- दंड आकारण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी रोख रक्कम देण्याच्या निर्णयाबाबत

**(१६) * ५०४९ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर विभागातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांच्या खात्यावर अन्न धान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये १५०/- तर दिनांक २० जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये १६०/- हे प्रति महिना, प्रति लाभार्थी थेट बँक खात्यात रक्कम जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रोख रक्कम अतिशय अपुरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण न होता आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत असून या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत ऑल महाराष्ट्र फेअर प्राइस शॉपकिपर फेडरेशनने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्नधान्य देण्याचा निर्णय रद्द केल्याने सामान्य नागरिकांना खुल्या बाजारात नाईलाजाने धान्य खरेदी करावे लागत असून, खुल्या बाजारातील धान्यांच्या प्रति किलो किंमती फार जास्त असल्याने रेशनिंगवर थेट धान्य मिळावे हीच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गरीब शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी व त्यांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागू नये याकरीता अल्प दर असलेल्या रेशनिंगच्या दुकानातून त्यांना अल्प दरातील धान्य थेट मिळावे या निर्णयाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये १५०/- तर २० जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानूसार रुपये १७०/- प्रति महिना प्रति लाभार्थी थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्नाधीन विषयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, ऑल महाराष्ट्र फेअर प्राईस शॉपकीपर फेडरेशनने दिनांक २९/०९/२०२५ रोजीचे पत्र विभागास प्राप्त झालेले आहे. परंतु, सदर पत्रामध्ये अतिवृष्टी व पुरामुळे बाधित कुटुंबांना शासनाने भेदभाव न करता सर्व समान लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना, ए. पी. एल. शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य व केरोसिन वितरण करण्याबातचा निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

(४) हे अंशत: खरे आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. मात्र, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर विभागातील १४ जिल्ह्यांमधील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम देण्यात येते. त्यामुळे या शेतकऱ्यांकडून रोख रकमेऐवजी धान्य मिळावे अशी मागणी करण्यात येते.

(५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक २४/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, उस्मानाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एप्रिल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे (प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य, रुपये २.०० प्रति किलो गहू व रुपये ३.०० प्रति किलो तांदुळ या दराने) अन्नधान्याचा लाभ देण्यात येत होता. सदर योजनेकरीता आवश्यक असलेल्या अन्नधान्याची खरेदी केंद्र शासनाच्या Non NFSA योजनेंतर्गत गहू रुपये २२.०० प्रति किलो व तांदुळ रुपये २३.०० प्रति किलो या दराने करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत यापुढे गहू व तांदुळ उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाने विभागास कळविले होते. त्यामुळे अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर विभागातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांकरीता अन्नधान्याऐवजी थेट लाभ हस्तांतरण योजना सुरु करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेरूळ येथील आरक्षित भूखंडाचे सिडकोने व्यावसायिकांना वाटप केल्याबाबत

**(१७)** * **५५१४ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (नवी मुंबई) येथील सेक्टर २८ येथे भूखंड क्रमांक १२A, १२B, १२C व १२ D असे एकूण चार भूखंडाचे क्षेत्र २१२९७ चौरस मीटर असून, सदर भूखंड उद्यान, ज्येष्ठ नागरिक व अपंगाचे केंद्र, पोलीस स्टेशन, याकरीता आरक्षित असताना सदरील भूखंड सिडकोने एका व्यावसायिकाला निविदा प्रक्रियेतून वाटप केल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चारही भूखंड पार्थ अर्बन स्पेसेस लिमिटेड या कंपनीने रुपये १४९५ कोटी एवढ्या रकमेला सिडकोकडून खरेदी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूखंड आरक्षित असताना मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करुन सदर भूखंड विकासकास वाटप करण्यासंदर्भात शासनाने यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

सिडको पणन योजना क्र.४४/२०२५-२६ अंतर्गत एकूण ४८ भूखंडांसाठी दिनांक २०/०६/२०२५ रोजी भुखंड ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. त्यामध्ये नेरुळ येथील रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ सेक्टर २८ येथे भूखंड क्र. १२A, १२B, १२C, व १२ D चे एकूण क्षेत्र २१२९६.१७ चौ.मी. भुखंडाचा समावेश होता. सदर योजनेचा दिनांक ३१/०७/२०२५ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. उक्त योजनेच्या दिनांक ३१/०७/२०२५ रोजीच्या निकालानुसार मे. पार्थ अर्बन स्पेसेस लिमिटेड हे उच्च

बोलीधारक असून सदर भुखंडांचे भाडेपट्ट्याद्वारे वाटप केल्यास सिडकोस रुपये १४९६.३४ कोटी इतका महसूल प्राप्त होऊ शकतो.

मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.३९/२०१५ व २२/२०२१ मधील दिनांक २३/०१/२०२५ च्या निकालाच्या अनुषंगाने व नेरुळच्या सेक्टर २८ सिडकोच्या लेआउटनुसार नवी मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी सदर निविदा काढण्यात आली होती. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेने प्रकाशित केलेल्या विकास आराखड्याच्या अनुषंगाने उक्त भुखंडांबाबत सिडको महामंडळाने दिनांक ०८/०९/२०२२, दिनांक ०८/०७/२०२४ व दिनांक २१/०८/२०२५ रोजीच्या सूचना व आक्षेप नोंदविला होता. तथापि, नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यास मान्यता प्रदान केल्यानुसार सदर भूखंडाच्या वापरात बदल झाल्याने सदर भूखंडाचे वाटपपत्र संबंधित विजेत्या बोलीधारकास देण्यात आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचे लाभ मिळण्याबाबत

**(१८) * ४९१३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील गत १० वर्षात किमान २००० कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून, प्रत्येक महिन्याला २५ ते ३० कर्मचारी सेवानिवृत्त होतात अशा सेवानिवृत्त झालेल्या किमान ५०० कर्मचाऱ्यांना गत पाच वर्षांपासून सेवानिवृत्तीचे लाभ जीपीएफ/उपदान व इतर भत्ते दिले गेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना थकीत रकमेअभावी आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असून, उक्त कर्मचारी गत पाच वर्षापासून महानगरपालिका कार्यालयात पाठपुरावा करत असून त्यापैकी ३० कर्मचारी हे वित्तीय लाभांशाशिवाय चार वर्षांत मृत्यूमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे वित्तीय लाभ वेळेवर न देण्याची कारणे काय आहेत, यास कोण जबाबदार आहे, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे वित्तीय लाभ तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणी हेतूपुरस्पर संचिका करण्यास विलंब करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत मागील १० वर्षात एकूण २१८८ महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी हे सेवानिवृत्त झाले आहेत. सर्व सेवानिवृत्तांचे जीपीएफ व विमा संबंधित देयके महानगरपालिकेकडून प्रदान करण्यात आली असून सेवा निवृत्तीवेतन नियमितपणे अदा केले जाते.

तथापि, वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील अद्यावत करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीनुसार १३४ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे ग्रॅच्युटी व इतर भत्ते देणे बाकी असल्याबाबत महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे, खरे नाही.

महानगरपालिकेकडून सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या स्व:उत्पन्नातुन सेवानिवृत्तांच्या ग्रॅच्युटी व इतर भत्ते या देयकांची अदायगी करण्यात येत असल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार सेवानिवृत अधिकारी / कर्मचारी यांना ज्येष्ठता यादीनुसार देयकांची अदायगी करण्यात येत आहे.

तथापि, सदर प्रतिक्षा कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास प्रथम प्राधान्याने देयक अदायगी महानगरपालिकेकडून करण्यात येते.

(३) व (४) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा निवृत्तीचे देयक लेखा विभागामध्ये प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार ज्येष्ठता यादीनुसार संबंधित देयके महानगरपालिकेकडून अदा करण्यात येत असतात. हेतुपुरस्पर संचिकांना विलंब लावला जात नसल्याबाबत महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * ५७७८ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.संजय खोडके, श्री.योगेश टिळेकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषध प्रशासनातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची तसेच औषध निरीक्षकांच्या ५७१ पैकी ४५५ (सुमारे ६९%) पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि उत्पादनांचे नियमन सुनिश्चित करण्यासाठी निरीक्षणाची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असूनही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे बनावट/भेसळयुक्त, मुदतबाह्य आणि निकृष्ट दर्जाच्या अन्न व औषध पदार्थांचा प्रसार वाढण्याचा धोक्याचा नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात, विशेषतः अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये, अन्न व औषध प्रशासन विभागातील सह आयुक्त, सहाय्यक आयुक्त व औषध निरीक्षकांची मंजूर असलेली अनेक पदे रिक्त असून विदर्भात दुय्यम दर्जाची औषधी विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून रुग्णांच्या आरोग्यावर त्याचे दुष्परिणाम होत असून या विभागात औषधांची होलसेल व रिटेल दुकानांची संख्या हजारोंमध्ये असल्यामुळे, या दुकानांची तपासणी करण्याकरीता अधिकारी/कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे भेट देऊ शकत नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरमधील ‘डायटाईलयीन ग्लायकॉल’ आणि ‘सिप्रोफ्लाक्सिन’ या बनावट औषधांच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या सबंधितांवर गुन्हे दाखल करुन बनावट औषधांचा पुरवठा केल्याप्रकरणी राज्यव्यापी अहवाल शासनाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालातील तपशील काय आहे तसेच शासनाने अन्न व औषध प्रशासनातील रिक्त पदे भरण्याबाबत व बनावट, निकृष्ट दर्जाची व मुदतबाह्य अन्न व औषधी पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अन्न व औषध प्रशासनात औषध विभागातील सह आयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक या संवर्गात एकूण २७६ पदे मंजूर असून त्यापैकी १७६ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत. तसेच, अन्न विभागातील सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी या संवर्गात एकूण ४४८ पदे मंजूर असून त्यापैकी ३८ पदे रिक्त आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या अमरावती विभागात एकूण पाच जिल्ह्यांमध्ये औषध विभागातील सह आयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक या संवर्गात एकूण १८ पदे मंजूर असून त्यापैकी १५ पदे रिक्त आहेत तसेच, अन्न विभागातील सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी या संवर्गात एकूण २६ पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे रिक्त आहेत.

अन्न व औषध प्रशासनातील उपलब्ध असलेल्या औषध निरीक्षक यांना औषध उत्पादक व विक्रेत्यांच्या तपासण्या औषधे व सौंदर्य प्रसाधनाचे घ्यावयाच्या नमुन्यांबाबत वार्षिक इष्टांक देण्यात येत असून सध्या कार्यरत औषध निरीक्षकांमार्फत सदर इष्टांक पूर्ण करण्यात येत आहेत.
(३) व (४) श्रीसन फार्मा, तामिळनाडू या कंपनीच्या कोल्ड्रीप सिरप या औषधामुळे नागपूरमध्ये बालमृत्यू झाले आहे. सदर बालक मध्यप्रदेश राज्यातून नागपूर येथे दाखल झाले होते. सदर औषध राज्यात कोठेही वितरीत केलेले नाही. सिप्रोफ्लाक्सिन या बनावट औषधांच्या अनुषंगाने संबंधित उत्पादकांची व पुरवठादारांची यादी कार्यक्षेत्रात सार्वजनिक करण्यात आली आहे व संबंधितांवर खटला दाखल करण्यात आला आहे.

औषध निरीक्षक यांची १०९ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २९/०७/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द केली असून दिनांक २२/०३/२०२६ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत सन २०२५ मध्ये औषधांचे २८७६ नमुने घेण्यात आले. त्यापैकी २३५ अप्रमाणित आढळले असून सदर प्रकरणी उत्पादकांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत संबंधित राज्याचे औषध नियंत्रक यांना कळविण्यात आले आहे. तसेच ११२ प्रकरणी खटला दाखल करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तसेच, अन्न व औषध प्रशासनामार्फत माहे एप्रिल, २०२५ ते ऑक्टोंबर, २०२५ या कालावधीत अन्न आस्थापनांच्या एकूण ८८४१ आस्थापनांच्या तपासणी करण्यात आलेल्या असून एकूण ६३५

प्रकरणी तडजोड अर्ज दाखल केले आहेत. तसेच, ३३४८ आस्थापनांना सुधारणा नोटीस पाठविण्यात आल्या असून त्यापैकी ९३ आस्थापनाचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. एकूण ११९ प्रकरणी न्यायनिर्णय प्रकरणे दाखल करण्यात आली असून त्यापैकी ०८ प्रकरणी रुपये १,०४,५००/- इतका दंड शासन खाती जमा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व नगरपालिकांमधील दहन घाटांवर वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारण्याबाबत

**(२०) * ५१३० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या पर्यावरणपूरक दहन घाट उभारणी योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिकेने तीन दहन घाटांवर वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी रुपये पाच कोटींची तरतूद करण्यात आली असल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर राज्यातील इतर सर्व नगरपालिकांमधील दहन घाटांवर वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व नगरपालिकांमधील दहन घाटांवर दररोज अनेक मृतदेहांचे दहन केले जाते, त्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणाचे प्रमाण व त्याचा आरोग्य आणि पर्यावरणावर होणारा परिणाम याबाबत शासनाकडे अधिकृत आकडेवारी उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील सर्व नगरपालिकांमध्ये दहन घाटांवर वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारण्यासाठी आवश्यक निधी, तांत्रिक मार्गदर्शन तसेच वायू प्रदूषण रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे National Clean Air Programme (NCAP) अंतर्गत पर्यावरणपुरक दहनघाट उभारणी करण्याकरीता शासनाच्या १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीतून मोक्षधाम, मानेवाडा व गंगाबाई दहनघाटावर वायु प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारणीकरीता रुपये ५,२१,३१,२३५/- रकमेस मंजूरी देण्यात आली असून सदर कामाचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत
(२), (३) व (४) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०१ जुलै, २०१६ रोजी राज्यातील शहरांचे वायुप्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी निर्देश दिले आहेत. त्यानुसार National Clean Air Programme (NCAP) अंतर्गत राबविण्याकरीता प्रारूप कृती आराखडे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यात “ ७. पारंपारीक शवदाहिनी वरुन विद्युत/गॅस इंधनावर आधारीत शवदाहीनींचा वापरास प्रोत्साहन देणे” या बाबीचा समावेश आहे. त्याअनुषगाने शासनाच्या पर्यावरण विभागाअंतर्गत

असलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रिसदस्यीय समितीचे संमतीपत्र घेऊन संबंधित महानगरपालिका व नगरपालिकांना कृती आराखडा राबविण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार राज्यातील १९ महानगरपालिकांच्या कृती आराखड्यास मंजुरी दिली आहे.

सदर कृती आराखड्यांमधील उपरोक्त बाबीनुसार राज्यातील १९ शहरांमधील १०५ ठिकाणच्या शवदाहिन्या या विद्युत/गॅस इंधनावर रुपांतरीत करण्यात आल्या आहेत. सदर कामाकरीता National Clean Air Programme (NCAP) अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी रुपये ८३ कोटी इतका निधी महानगरपालिकांद्वारे खर्च करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धडगाव-वडफळ्या-रोशनमाळ (जि.नंदुरबार) नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेत कोट्यवधी रकमेचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१) * ५४१० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धडगाव-वडफळ्या-रोशनमाळ (जि.नंदुरबार) नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेत २ कोटी रुपयांचा अपहार झाला असल्याची बाब दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धडगाव-वडफळ्या-रोशनमाळ पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत धडगाव-वडफळ्या-रोशमाळ बु. नगरपंचायतच्या रुपये ३८.२३ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाची ५५ % भौतिक प्रगती झाली असून प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण धडगाव-वडफळ्या-रोशमाळ बु. नगरपंचायत मार्फत करण्यात आलेले आहे. तसेच, प्रकल्पातील मटेरियलची चाचणी अहवाल शासन मान्य संस्थेकडून करून घेण्यात आलेले असून आजमितीस सदर योजनेतील कामाचे पहिल्या व दुसऱ्या देयकाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे व जळगाव अशा शासकीय संस्थांकडून झाल्यानंतरच कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली असून तिसऱ्या व चौथ्या कामाचे देयक हे Excavation आणि पाणी उपसा करण्याबाबतच्या कामाचे असल्याने सदर देयकाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही. सद्य:स्थितीस प्रकल्पाचे काम सुरळीतरित्या सुरू असून सदर प्रकल्पाच्या कामात कुठेही अनियमितता झाली नसल्याचे मुख्याधिकारी, धडगाव- वडफळ्या-रोशमाळ बु. नगरपंचायत यांनी कळविले आहे.

-----------------

## दिवा (जि.ठाणे) येथील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेले जलकुंभ वापराविना बंद असल्याबाबत

**(२२) * ५४५१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवा शहरात सन २०१२ च्या पूर्वीपासून बांधून तयार असलेले जलकुंभ वापराविना बंद असल्याने येथील नागरिकांना पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा येथील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या दोन विशाल जलकुंभाची उभारणी १३ वर्षांपूर्वी करूनही अद्यापपर्यंत सुरू न केल्याने शासनाच्या कोट्यवधी रकमेच्या निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवा शहरातील नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत असल्याने उक्त जलकुंभ नागरिकांच्या वापरात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा प्रभाग समिती अंतर्गत बेतवडे येथे १.५० द.ल.लि. क्षमतेचे दोन जलकुंभ सन २०११ मध्ये बांधण्यात आले होते. सन २०११ मध्ये दिवा शहरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत १२.०० द.ल.लि. प्रतिदिन एवढा पाणीपुरवठा होतो, सदरचा पाणीपुरवठा हा लोकसंख्येच्या प्रमाणात कमी असल्याने जलकुंभ भरणेस लागणारा वाढीव कालावधी विचारात घेता जलकुंभ वापरात न घेता थेट रित्या (direct) नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र, यामुळे नागरिकांना पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

सदरचे जलकुंभ १३ वर्षांपूर्वी बांधण्यात आले. मात्र अपुरी वहन व्यवस्था व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत दिवा प्रभाग समिती मध्ये कमी पाणीपुरवठा यामुळे सदरचे जलकुंभ कार्यान्वित करण्यात आले नाहीत. तांत्रिक अडचणी मुळे जलकुंभ कार्यान्वित करण्यात आलेले नसल्याने निधीचा अपव्यय झालेला नाही. सदरचे जलकुंभ सुस्थितीत आहेत.

(३) सद्य:स्थितीत निळजे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ च्या टॅपिंग मधून सुमारे ४० द.ल.लि. पाणीपुरवठा होत असून सदरचे जलकुंभ कार्यान्वित करणेसाठी जलकुंभाचे इनलेट आऊटलेट बायपास व्हॉल्व्ह नवीन बसविणे, वहन वाहिन्याची जोडणी करणे ही कामे सुरू असून नजीकच्या कालावधीत दोन्ही जलकुंभ वापरात आणणेबाबत महानगरपालिकेकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सहायक अनुदान देण्याबाबत

**(२३) * ४९७१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनामार्फत सहायक अनुदान दिले जाते, परंतु वित्त विभागाकडून अनुदान वितरणास विलंब होत असल्यामुळे सुमारे ६० हजार नगरपरिषद व नगरपंचायतीत कर्मचाऱ्यांना चार ते पाच महिने वेतन दिले नसल्यामुळे त्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतींमधील काही कर्मचारी, सफाई कामगार व संगणक ऑपरेटर यांचा वेतन अनुदान योजनेत समावेश करण्यात आलेला नसून त्यांच्या समावेशासाठी विविध अटी घालण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे मिळावे आणि अपात्र कर्मचाऱ्यांचा अनुदान योजनेत समावेश तातडीने करण्यात यावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायतीच्या आकृतीबंधात मंजूर पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दरमहा निश्चित केलेली सहायक अनुदानाची रक्कम महिन्यांच्या दहा तारखेपर्यंत वितरीत करण्यात येते.

तथापि, ज्या महिन्यांत कर्मचाऱ्यांची वेतनवाढ वा महागाई भत्ता यामध्ये वाढ होते तेव्हा सर्व नगरपरिषद/नगरपंचायतीकडून सुधारीत अनुदानाची मागणी प्राप्त होण्यास काहीसा कालावधी लागतो त्यावेळी सहायक अनुदान वितरणास काहीसा वेळ लागतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात बेस्ट उपक्रमांतर्गत बसेसमधील अपंगांसाठीच्या यंत्रणेचा वापर करण्याबाबत

**(२४) * ५३६० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात बेस्ट उपक्रमाव्दारे अपंगांचा प्रवास सुकर व्हावा या हेतूने एकमजली बसमध्ये व्हीलचेअरसह चढण्यासाठी बसविलेल्या यंत्रणेचा वापरच होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वाहक व चालकांना प्रशिक्षण नसल्याने अपंगांना या यंत्रणेद्वारे बसमध्ये प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बसमधील सदर यंत्रणेचा वापर होत नसून, यंत्रणेचा मूळ हेतूच साध्य होत नसल्याचे स्पष्ट होत आहे, तरी बस चालकांना सदर यंत्रणेचा वापर करण्याकरीता प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेस्ट उपक्रमांतर्गत विकलांग व्यक्तींचा प्रवास सुकर व्हावा याकरीता व्हीलचेअरसह बसमध्ये चढण्यासाठी बसविलेल्या यंत्रणेचा वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे, खरे नाही.

मुंबई शहरात बेस्ट उपक्रमाद्वारे ४६३ इलेक्ट्रीक वातानुकुलित बसगाड्यांवर व्हिल चेअरसह दिव्यांग प्रवासी प्रवास करण्याकरीता यंत्रणा कार्यन्वित आहे
(२) हे, खरे नाही.
(३) हे, खरे नाही.

व्हिलचेअर सह प्रवाशांना रॅम्पवरून चढ उतार करण्याकरीता बसवाहक व बसचालक यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे
(४) बेस्ट उपक्रम प्रशासनाकडून ही सेवा उपलब्ध करून दिलेल्या ४६३ इलेक्ट्रीक वातानुकुलित बसची तपासणी व देखभाल करण्यात येत असून आवश्यकतेनुसार दुरूस्ती करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * ४७७७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यातील सुमारे ९७ हजार कि. मी. रस्त्यांपैकी सुमारे ४३ हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांवर यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाली असून महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या अध्यक्षांनी कंत्राटदारांची प्रलंबित देयकांची रक्कम आधी देण्यात यावीत नंतरच नवीन रस्त्यांची व दुरुस्तीची कामे काढण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने अनेक ठिकाणी केलेल्या विकासकामांची कंत्राटदारांना द्यावयाची कोटयवधी रुपयांची देयके थकीत ठेवली असून वर्षभर शासनाकडे यासाठी पाठपुरावा करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्यातील कंत्राटदारांनी त्या निषेधार्थ राज्यभर आंदोलने पुकारली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीव्यतिरीक्त अन्य विहित मार्गाने उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्याकरीता शासनाने नियोजन केले आहे काय,
(४) असल्यास, रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याकरीता तसेच रस्त्यांची दुरवस्था दुर करण्याच्या दृष्टीने तातडीने राज्यातील कंत्राटदारांची थकीत देयके अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) राज्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी १,०९,०२१.४ कि.मी. इतकी असून सन २०२५ च्या पावसाळ्यात अतिवृष्टी व पूरामुळे बाधित झालेली एकूण लांबी ६,९१९.०२ कि.मी. इतकी आहे.

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ यांच्याकडून कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करणेबाबत विभागास विविध निवेदने प्राप्त झाली आहेत. प्रलंबित देयके अदा करण्याकरीता चालू आर्थिक वर्षात रस्ते उपक्षेत्रातंर्गत कार्यक्रम खर्चाकरीता अद्यापपर्यंत मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ८०% म्हणजेच रुपये १३५२९ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) होय.
(४) अतिवृष्टीमुळे बाधित रस्ते वार्षिक देखभाल करार (AMC) व्दारे वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे अतिवृष्टी बाधित रस्ते व पुलांची दुरुस्ती–पुर्नबाधणीसाठी "आपत्ती व्यवस्थापन विभाग" मार्फत केंद्रशासनास निधी उपलब्धतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

विभागांतर्गत शिल्लक प्रलंबित व उर्वरित कालावधीत नव्याने निर्माण होणारी देयके विचारात घेऊन विहित मार्गाने (पुरक मागणी तसेच केंद्र शासन बिनव्याजी कर्ज योजना) अतिरिक्त तरतूद करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) लागू नाही.

-----------------

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्जाचे व्याज परतावे विहित वेळेत न मिळाल्याने उद्योजकांचे सिबिल स्कोअर खराब होत असल्याबाबत

**(२६) * ५६७७ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २५२९ ला दिनांक १० जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठा समाजासाठी स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्जाचे व्याज परतावे वेळेत मिळत नसल्याने या समाजातील तरुण उद्योजकांचे सिबिल स्कोअर खराब होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुण उद्योजकांना देण्यात येणाऱ्या कर्जाच्या व्याजाचे परतावे दर महिन्याच्या एका ठराविक तारखेपर्यंत देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(३) असल्यास, उद्योजकांचे सिबिल स्कोअर खराब न होता, या सिबिल स्कोअरच्या नियमामध्ये बदल करून जे कर्जदार वर्षभराचे ई.एम.आय.त्याच वर्षात देत असतील अशा कर्जदारांचे सिबिल स्कोअर खराब असल्याबाबत बँकांचा शेरा मिळू नये याकरीता शासन कोणते धोरण आणणार आहे काय,
(४) असल्यास, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी व्याज परतावा प्रक्रिया वेळेवर पूर्ण करुन तरुण उद्योजकांचे सिबिल स्कोअर सुधारू शकतील आणि त्यांच्या व्यवसायाला योग्य पाठबळ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१), (२), (३) व (४) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी शासनामार्फत महामंडळासाठी रुपये ७५० कोटी अर्थसंकल्पित करण्यात आले असून त्यापैकी रुपये ५०० कोटी महामंडळास वितरित करण्यात आले आहेत. योजनांच्या अटी-शर्ती व निकषांच्या आधारे महामंडळामार्फत १ एप्रिल, २०२५ ते २५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत १,२५,५३२ लाभार्थ्यांच्या ३,९४,८६९ दाव्यांना रुपये ३६७,४६,९७,७३१/- इतक्या रकमेचा व्याज परतावा करण्यात आला आहे. सिबिल स्कोअर खराब होणे किंवा त्यातील बदल ही लाभार्थ्यांच्या कर्ज परतफेडीच्या शिस्तीवर आधारित स्वयंचलित प्रक्रिया आहे. शासन स्तरावरुन यामध्ये कोणत्याही स्वरुपात हस्तक्षेप करता येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरासाठीच्या पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२७) * ५१५४ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्याचे मुख्यालय असलेल्या पंधरा लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या छत्रपती संभाजीनगर शहरास आठवड्यातून एकदा किंवा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने सन १९७५, १९९१ व २००६ मध्ये विविध योजना राबवूनही पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिकेच्या एकत्रित योजनेतून १६८० कोटी रुपयांच्या जीवन प्राधिकरण योजनेचा कार्यादेश दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कार्यादेशाप्रमाणे सदर काम ३ वर्षांत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काम सुरु होऊन साडेचार वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही अद्याप अपूर्णावस्थेत असून या काळात योजनेचा खर्च २,७४० कोटी रुपयांवर गेला असून अद्याप योजनेचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत तसेच सदर योजना किती कालावधीत पूर्ण होईल,
(४) असल्यास, जायकवाडी धरणावर या भागातील नागरिकांची तहान भागत असून महानगरपालिकेने तलावातील गाळ आणि खोलीकरण, रुंदीकरण करुन पावसाळ्यात तलाव पूर्ण क्षमतेने भरावेत याकरीता तसेच सदर शहरास पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु रहावा यादृष्टीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहराच्या रुपये १६८०.५० कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती.

सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या मुख्य कामाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ रोजी कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर, सदरील योजनेच्या सुधारित प्रस्तावास अनुसरून केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत रुपये २७४०.७५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाच्या कामात विविध विभागांच्या परवानग्या, भूसंपादन करण्यातील अडचणी, राष्ट्रीय महामार्ग लगत काम करताना येणाऱ्या अडचणी, काही ठिकाणी स्थानिक नागरिकांचा विरोध इ. विविध कारणांमुळे योजना कार्यान्वित करण्यास विलंब झाला होता.तथापि, सद्य:स्थितीस प्रकल्पाची ८३ % भौतिक प्रगती झाली असून योजनेतील आवश्यक कामे पूर्ण करून योजना अंशतः कार्यान्वित करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत नियोजन करण्यात आले असून योजनेचे उर्वरित कामे करून माहे डिसेंबर, २०२६ अखेर योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

(४) व (५) जायकवाडी धरण हे जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत असून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार कालव्यातील गाळ काढून स्वच्छता केली जाते.

छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयाद्वारे गठित समितीमार्फत दर पंधरा दिवसांनी आढावा घेऊन संनियंत्रण केले जात आहे. तसेच, राज्य शासनामार्फत प्रकल्पाच्या प्रगतीच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

-----------------

## जोगेश्वरी येथील इंदिरानगर एस.आर.ए. गृहनिर्माण संस्थेच्या विकासक निवड प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२८) * ५४०६ श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरानगर एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था मर्यादित, जोगेश्वरी (पूर्व) अंतर्गत दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी विकासक निवडीसाठी झालेल्या निवडणूक प्रक्रियेमध्ये शासन निर्देशानुसार बायोमेट्रिक पध्दत व व्हिडीओ शुटिंग अनिवार्य असतानाही ३८ मतदारांची बायोमेट्रीक नोंद नसताना त्यांचे मतदान ग्राह्य धरणे, दोन मृत व्यक्तींचे मतदान वैध मानणे, पारदर्शकतेच्या प्रक्रियेतून मतदान केलेल्या सभासदांचे मतदान वगळणे, एकतर्फी विकासकाची निवड करणे अशा प्रकारच्या अनियमितता निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विकासकाच्या निवडीचा ठराव मांडणी आणि त्याच्या मंजुरीसाठी लोकांचा कौल घेणे या मुख्य उद्देशाऐवजी थेट विकासकाची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवडणूकीच्या मतपत्रिकेवर फक्त एकाच विकासकाचे नाव असणे व त्याला दुसरा प्रतिस्पर्धी नसणे तसेच सहाय्यक निबंधक यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे प्राधिकृत अधिकारी व

विकासक यांनी केलेला गैरव्यवहार व निवडणूक प्रक्रियेदरम्यान नियम व अटींचे उल्लंघन करणे, वैयक्तिक आर्थिक लाभासाठी खोटा व दिशाभूल करणारा अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेबाबत शासनाने चौकशी करुन बायोमेट्रीक नोंद नसलेल्या व मृत व्यक्तींच्या मतदानास वैध मानण्याच्या प्रकारांबाबत तसेच इतर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व विकासकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सदरची नविन विकासक निवडीची मतदान प्रक्रिया झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१६९ च्या अनुषंगाने सदरची सभा ही बायोमेट्रीक पध्दत व व्हिडीओ शुटींग करुन घेण्यात आलेली आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मिळणारी सदनिका ही पती व पत्नी या दोघांच्या नावे दिली जाते. एखादा विकासक निवडतांना झोपडीधारक मृत पावल्यास त्यांच्या पत्नीला मतदानाचा अधिकार दिला जातो. त्यामुळे सदर योजनेमध्ये विकासक निवडीच्या वेळी मृत व्यक्तीच्या पत्नीने मतदान केलेले आहे. तसेच, संस्थेने एकाच विकासकाचे नाव सुचविल्याने त्याची विकासक म्हणुन सहमती पडताळणी करण्यात आलेली आहे. तसेच तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मतदान वगळून देखील विकासकास ५१% पेक्षा जास्त सहमती मिळालेली आहे.

(२) हे खरे नाही.

विकासकाची निवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार गुप्त मतदान पध्दतीने करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

सदरची विकासक निवडीची सभा ही संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विकासकाचे नाव मतदानाकरीता घेण्यात आलेले असल्याने नियमानुसार सभा घेण्यात आलेली असून अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

(४) याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषगाने प्राधिकरणाच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने विकासक निवडीच्या वेळी कोणतीही अनियमितता झाल्याचे आढळून आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत

**(२९) * ४८८१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात ३० मीटरपेक्षा जास्त लांबी असलेल्या पुलांची संख्या ४९ असून यापैकी अनेक पूल मोडकळीस आले असतानाही या सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले नसून यातील अनेक पूल

सध्या जीर्ण झाल्यामुळे त्यांच्या दुरुस्तीची गरज असून या मोडकळीस आलेल्या पुलांमुळे स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोडकळीस आलेल्या या पुलांची तातडीने दुरुस्ती व्हावी, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार केली जात आहे, परंतु त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व धोकादायक पुलांवरुन मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असून, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तरी या सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर या मंडळाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यावर ३० मीटरपेक्षा वरील एकूण १३० मोठे पूल अस्तित्वात असून, त्यापैकी आवश्यक असलेल्या २० पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. कमकुवत पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन प्राप्त अहवालानुसार सदर पूलावर आवश्यक त्या दुरुस्तीची कामे पूर्ण करुन पूलावरील रस्ते वाहतूक सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, नागपूर जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्ग क्र. १९ वरील कि.मी. ३३/४०० मधील अस्तित्वातील असलेला पूल कमकुवत झाल्यामुळे सदर पुलाची पुनर्बांधणी पूर्ण करण्यात आली आहे.

(३) नागपूर जिल्ह्यातील प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यावरील ३० मीटरपेक्षा जास्त लांबीच्या एकूण १३० मोठे पूलांपैकी २० पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून सदर पूल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेकडून खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल व तळोजा या शहरांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३०)** * **४६८१ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल व तळोजा या शहरांमध्ये सिडकोकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा हा कमी दाबाचा केला गेल्याने नागरिकांना खाजगी टँकरने पाणी विकत घ्यावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ, निर्मळ आणि मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी अकार्यक्षम ठरलेल्या सिडकोकडून कळंबोली मधील अनेक सोसायटींना गाळ मिश्रित गढूळ पाणी सोडण्यात आल्याने नागरिकांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा वसाहत टँकरमुक्त व्हावी यासाठी उभारण्यात आलेल्या दोन जलकुंभातून मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या टँकर भरून पाणी विक्री केली जात असल्याने नागरिकांना तेच पाणी विकत घ्यावे लागत असल्याची तक्रार 'सिडको फेडरेशन' कडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हेटवणे धरणात मुबलक पाणी असतानाही खारघर मधील रहिवाशांनाही टँकरने पाणी घ्यावे लागत असून, सदर भागातील पाणी समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल व तळोजा या नोडला सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण (MJP), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), नवी मुंबई महानगरपालिका व हेटवणे योजने मधून केला जातो.

माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये MIDC कडून ३ वेळा तसेच MJP कडून १ वेळा तातडीने दुरुस्तीचे काम करण्यासाठी shutdown घेण्यात आला होता.तद्नंतर पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पुढील ३ ते ४ दिवसाचा कालावधी लागतो. माहे सप्टेंबर मध्ये ४ वेळेस shutdown झाल्याने पाणी वितरण व्यवस्था विस्कळीत झाल्याने या महिन्यामध्ये पाणीपुरवठा कमी दाबाने झाला होता.सोसायटींच्या मागणीनुसार सिडकोकडून टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

तळोजा विभागात ५ दलली क्षमतेचे २ जलकुंभ बांधण्याचे काम पूर्ण होऊन जलकुंभ कार्यान्वित झाले आहेत. तळोजा नोडची पाण्याची मागणी २० दलली इतकी आहे. सद्य:स्तिथीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ६ दलली व हेटवणे धरणातून सरासरी १० दलली असा एकूण १६ दलली इतका पाणीपुरवठा तळोजा नोडसाठी केला जातो तथापि, तळोजा नोडसाठी ४ दलली पाणी पुरवठ्याची तूट आहे. यामुळे जलकुंभापासून दूर असलेल्या सोसायट्यांना व सिडको गृहनिर्माण प्रकल्प सेक्टर- २१, २२, २७, ३४, ३६ व ३७ येथे कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो म्हणून किमान गरज भागविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. पुरवठा केलेल्या टँकरची नोंद जलकुंभ येथे असलेल्या नोंद वही मध्ये करण्यात येते. तसेच सोसायटीला पोच पावती देण्यात येते. टँकर नोंद वही व सोसायटीला देण्यात आलेल्या पोच पावती याची दररोज पडताळणी करण्यात येते.

तसेच टँकरचे व्यवस्थापन योग्यरीत्या होण्यासाठी टँकरवर GPS system बसविण्यात आली असून त्यामुळे अवैधरित्या टँकर भरून पाणी विक्री केले जात नाही.
(४) सिडकोमार्फत हेटवणे जलवाहिनी वरुन ६७ गावांना व सिडको विभागातील ४९ गावांना अंतर्गत जलवाहिनी वरुन पुरवठा केला जातो. खारघर विभागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी जलकुंभ वहाळ ते जलकुंभ खारघर, सेक्टर-२६ पर्यंत NH-४B मार्गे १५०० मिमि व्यासाची जलवाहिनी दिनांक ३०/०९/२०२२ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त दिर्घकालीन उपाययोजना म्हणून कोंढाणे प्रकल्प व बाळगंगा प्रकल्प अन्वये पाणीपुरवठा व वितरणाचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## वर्धा जिल्ह्यातील मौजा साहुर ते तारासावंगा (ता.आर्वी) व मौजा सालोरा ते दुर्गवाडा (ता.आष्टी) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३१) * ५३८१ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा साहुर ते तारासावंगा (ता.आर्वी, जि.वर्धा) तसेच आर्वी विधानसभा मतदारसंघातील मौजा सालोरा ते दुर्गवाडा (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील रस्त्यांचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे पावसामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचून पिकांचे नुकसान झाल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याचे निवेदन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्त्यावरील पावसाचे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या निविदेमध्ये समाविष्ट असलेल्या नियमानुसार काम न केल्याबाबत दोषी कंत्राटदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

मौजा साहूर ते तारासावंगा (ग्रामा-३२) कि.मी.०/०० ते ४/५०० लांबीतील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांचेमार्फत प्रगतीत असून रस्ते कामामुळे शेतीचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

मौजा सालोरा ते दुर्गवाडा (तालूका आष्टी, जिल्हा वर्धा) हा रस्ता इजिमा ०२ असून जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वर्धा यांच्या अखत्यारीत असून त्याबाबतही शेतकऱ्यांचे नुकसान झाले नसल्याची बाब जिल्हा परिषदेने निदर्शनास आणून दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(i) मौजा साहूर ते तारासावंगा ग्रा.मा.३२ या रस्त्याचे कामामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस कच्ची गटारे काढून उतार जवळच्या ओढ्यात काढण्यात आलेला असून रस्त्याचे पाणी शेतात शिरून शेताचे नुकसान झालेले नाही. तसेच काम सुरू असताना वेळोवेळी कामाच्या गुणवत्ता चाचण्या घेण्यात आल्या आहेत.

(ii) मौजा सालोरा ते दुर्गवाडा हा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वर्धा यांचे अखत्यारीत असून सबंधीत विभागाकडून प्राप्त अहवालानुसार सदर रस्ता इ.जि.मा.-२ असून यामध्ये साखळी क्र. २/०० ते ३/०० कि.मी. मध्ये खडीकरणाचे काम लेखाशीर्ष ५०५४-४८९२ अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत पूर्ण करण्यात आले होते, सदर काम सुस्थितीत आहे. सदरचे कामामुळे कोणत्याही शेतात पाणी जावून शेतकऱ्याचे नुकसान झाल्याची बाब आढळून आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहूरगड (जि.नांदेड) येथील रेणुका माता मंदिराच्या विकासकामांकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३२) * ५८६३ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणुका माता मंदिर, माहूरगड (ता.किनवट, जि.नांदेड) येथील रोप-वे, स्काय वॉक आणि लिफ्ट उभारण्याच्या कामांचा राज्य आराखड्यात समावेश करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांमुळे माहूरगडाच्या विकासाला चालना मिळेल तसेच या प्रकल्पांमुळे भाविकांना व वयोवृध्दांना गडावर दर्शनासाठी जाणे सुकर होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहूरगडावरील रेणुका माता मंदिरासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी रोप-वे, स्काय वॉक आणि लिफ्ट उभारण्याच्या कामांकरीता व अन्य सुविधांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदरचे काम केंद्रीय मार्ग निधी (CRF) मधुन मंजूर करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) रोप-वे, स्काय वॉक व लिफ्ट उभारण्याचे काम (इतर अनुषंगीक कामांसह) केंद्रीय मार्ग निधी या योजनेंतर्गत मंजूर असून काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात तीन महानगरपालिका स्थापन करण्याबाबत

**(३३) * ५९१७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वाढते नागरीकरण, हिंजवडी, चाकण येथील आयटी व ऑटो हब, चाकण एमआयडीसी मधील अनेक कंपन्यांमध्ये बहुसंख्य कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वाहनांची ये-जा तसेच तेथील अनधिकृत बांधकामे यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत असून, त्याकरीता हिंजवडी, चाकण आणि उरळी देवाची, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि वाघोली अशा तीन स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री तसेच पुणे जिल्हा पालकमंत्री यांनी शासनास विनंती केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या नागरीकरणामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांवर प्रचंड ताण येत आहे या पार्श्वभूमीवर, नियोजनबध्द विकासासाठी प्रशासकीय विकेंद्रीकरण आवश्यक असून पुणे जिल्ह्याच्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणाला आणि विकासाला नवी दिशा मिळावी याकरीता शासनाने सदर तीनही महानगरपालिका स्थापन करण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) या आशयाचा अभिलेख उपलब्ध नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील प्रवाशांकरीता "बेस्ट" मार्फत सुरक्षित प्रवास सुविधा देण्याबाबत

**(३४) * ६१५१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाकडे केवळ स्वत:च्या मालकीच्या ४१८ बसेस उपलब्ध असून मुंबई महानगर क्षेत्रातील प्रवाशांकरीता सुरक्षित प्रवास सुविधा देता यावी याकरीता बेस्ट प्रशासनाने सन २०१९ मध्ये ३३३७ बसेस खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट प्रशासनाकडे असलेल्या अपुऱ्या बसेस मुळे उर्वरित बसेस भाडेतत्वावर घेण्यात येत असून त्याकरीता १२ महिन्यात कंत्राटदारांनी २१०० बस पुरविणे आवश्यक असताना केवळ ६६५ बसेसचा पुरवठा केला असल्याचेही माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत बेस्ट प्रशासनाकडे प्रवाशांकरीता बसचा तुटवडा असून मुंबई शहरातील नागरिकांना नियोजित ठिकाणी पोहचण्यास अडचणी उद्‌भवत असून, ७५ वर्षांपेक्षा अधिक काळ मुंबई शहराची रस्ते मार्गावरील जीवनवाहिनी असलेली बेस्ट परिवहन सेवा बंद पडण्याच्या मार्गावर असल्यामुळे शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच बेस्ट उपक्रमाने याची गांर्भियाने दखल घेऊन सद्य:स्थितीत "बेस्ट" उपक्रमाकडे प्रवाशांकरीता मुबलक प्रमाणात बसेस उपलब्ध करुन बेस्ट बस सेवा पूर्ववत सक्रिय करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बेस्ट उपक्रमाने सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत सुमारे ११९१ बसगाड्यांचे आयुर्मान संपुष्टात आल्याने उपक्रमाच्या सेवेतून निष्कसित करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाकडे स्वमालकीच्या २४९ बसताफा उपलब्ध आहे. तथापि, ३३३७ स्वमालकीचा बसताफा राखण्याकरीता बेस्ट उपक्रमार्फत कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

बेस्ट उपक्रमाने खाजगी पुरवठादारांमार्फत ६५५५ बसगाड्या भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी २४९२ बसगाड्या बेस्ट उपक्रमाकडे उपलब्ध झाल्या असून उर्वरीत बसगाड्या लवकरात लवकरात उपलब्ध करून घेण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) भारत सरकारच्या प्रधानमंत्री इलेक्ट्रीक ड्राइव्ह रिव्होल्यूशन इन इनोव्हिटिव्ह व्हेईकल एन्व्हांसमेंट योजनेंतर्गत १५०० इलेक्ट्रीक वातानुकुलित वाहने उपलब्ध होण्याकरीता महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये केंद्र शासनास हमी दिली आहे व याची पुष्टी देखील भारतीय रिझर्व

बॅंकेकडून करण्यात आली आहे. यादरम्यान २५०० एकमजली बसगाड्या खासगी पुरवठादारांकडून प्राप्त करून प्रवाशांच्या सेवेसाठी प्रवर्तित करण्याबाबत बेस्ट प्रशासनामार्फत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सनस्क्रीन उत्पादनांच्या परिणामकारकतेबाबत शासन मानके नसल्याबाबत

**(३५) * ५५७४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध कंपन्यांकडून सनस्क्रीन उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून त्याच्या परिणामकारकतेची तपासणी करण्यासाठी शासन स्तरावर कोणतीही मानके उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारात विकल्या जाणाऱ्या सनस्क्रीन उत्पादनांवर लिहिलेल्या एसपीएफ (SPF) म्हणजेच सन प्रोटेक्शन या बाबीची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नाही आणि त्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा उत्पादनांची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळा नसल्यामुळे ग्राहकांना त्वचारोग व इतर आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्राहकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी व सनस्क्रीन उत्पादनांच्या परिणामकारकतेची हमी देण्यासाठी शासनाने कोणती मानके निश्चित केली आहेत किंवा करण्याचे नियोजन केले आहे तसेच अशा उत्पादनांच्या तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळा स्थापन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) सनस्क्रीनची एसपीएफ (SPF) चाचणी करण्यासाठी Sun protection test IS १७४९३: २०२१, Cosmetics Sun Protection Test Methods in Vitro Determination of Sunscreen Uv Protection factor (SPF) हे भारत मानक ब्युरोद्वारे प्रकाशित केलेले मानक उपलब्ध आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ मधील तरतुदीनुसार सौंदर्य प्रसाधने ही BIS Specification नुसार असणे आवश्यक असून सनस्क्रीन ही BIS मधील स्कीनक्रीन मानकांनुसार असणे आवश्यक आहे. तसेच, सनस्क्रीनमध्ये कोणते सौंदर्य प्रसाधने घटक असावेत किंवा कोणते असू नयेत याबाबत IS ४७०७:२०१७ मानकामध्ये अंर्तभूत करण्यात आले आहेत.
(२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सौंदर्य प्रसाधने नियम, २०२० मधील तरतूदीनुसार अन्न व औषध प्रशासनामार्फत सौंदर्य प्रसाधने उत्पादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात परवाने मंजूर करण्यात येतात.

राज्यात विविध सौंदर्य प्रसाधने सनस्क्रीन उत्पादने बाजारात उपलब्ध आहेत. बाजारात उपलब्ध असलेल्या औषधे व सौंदर्य प्रसाधनांचे नमुने औषध निरीक्षकांमार्फत अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठविण्यात येतात. सद्य:स्थितीत Sunscreen Lotion/Cream या नमुन्यांची चाचणी IS PCD १९ (१६२१) एप्रिल, २००१ Specifications for Cosmetics Lotion type (c)

च्या अंतर्गत निश्चित केलेल्या मानकानुसार करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत सनस्क्रीन उत्पादन परवाना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सौंदर्य प्रसाधने नियम, २०२० मधील तरतूदीनुसार दिला जातो. बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असणारे सनस्क्रीनचे नमुने औषध निरीक्षकामार्फत घेण्यात येऊन अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठविले जातात.

(४) सनस्क्रीन उत्पादनांची चाचणीसाठी भारत मानक ब्युरो यांनी खालील मानके प्रसिध्द केली आहेत.

१. Sun protection test IS १७४९३:२०२१, Cosmetics Sun Protection Test Methods in Vitro Determination of Sunscreen Uv. Protection factor (SPF).

२. IS १७४९३:२०२५ हे सुधारित मानक जुलै, २०२५ ला प्रकाशित झाले आहे. सदर मानक सहा महिन्यांनंतर अंमलात येणार आहेत. त्यामुळे जानेवारी, २०२६ पासून सदर BIS (भारतीय मानक ब्युरो) अन्वये Sunscreen उत्पादनांची चाचणी करण्यात येईल.

अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे प्रयोगशाळा कार्यरत असून नाशिक व पुणे येथे प्रयोगशाळा स्थापन करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेस्ट प्रशासनाने सेवानिवृत्त कामगारांना निवृत्ती उपदानाची रक्कम अदा करण्याबाबत

**(३६) * ४७१० श्री.सचिन अहिर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट प्रशासनाने सेवानिवृत्त कामगारांना त्यांची निवृत्ती उपदानाची रक्कम तात्काळ द्यावी, तसेच भविष्यात निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम तातडीने मिळण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक ५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्त कामगारांना निवृत्ती उपदानाची रक्कम, अंतिम थकित देयके, कोव्हिड भत्त्याची थकबाकी तसेच इतर थकित अनुदानाची रक्कम त्वरित मिळावी तसेच भविष्यात निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती उपदान किंवा इतर देय रक्कम मिळण्याची प्रक्रिया सुलभ आणि जलद करावी, यासाठी प्रशासनाने नियोजन करावे इ. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाने बेस्ट उपक्रमाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी आढावा बैठक घेऊन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सन २०२५-२६ वर्षाकरीता रुपये १,००० कोटी उपलब्ध करून द्यावेत व निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत रुपये १५०० कोटी इतका निधी टप्प्याने प्रदान करण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने निर्णय घेण्याबाबत निर्देश देण्यात आले. यापैकी रुपये ५०० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिनांक २५ एप्रिल, २०२५

रोजीच्या बैठकीत बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरीता उपाययोजना सुचित करण्यात आल्या आहेत यात बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाकडून परिवहन विभागास सादर केलेल्या भाडेदरात वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. महानगरपालिकेने वार्षिक अर्थसंकल्पीय तरतुदीत किमान ३ टक्के रक्कम राखीव ठेवण्याबाबत निर्णय झाला आहे.बेस्ट उपक्रमाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची देणी अदा करणे व ७५०० बसेस घेण्यासाठी बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमास तातडीने कम्प्लीट टर्न अराउंड पॅकेज देण्याबाबतचा समावेश आहे. यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका व बेस्ट याच्यास्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिवा (जि.ठाणे) येथे अनधिकृत शाळा सुरु असल्याबाबत

**(३७) * ५५५१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिवा (जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत शाळा सुरु असून, सदर अनधिकृत शाळांवर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांकडून कारवाई करण्यात येते परंतु, पुन्हा बंद केलेल्या शाळा प्रशासनाकडून नाव बदलून नव्याने सुरु करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा अधिकृत आहे की अनधिकृत याची माहिती पालकवर्गाला नसल्यामुळे या बेकायदेशीर शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे या अनधिकृत शाळांना अभय मिळत असून महानगरपालिका प्रशासनामार्फत लवकरात लवकर या शाळा बंद करुन संबंधित दोषींवर तसेच कारवाई केलेल्या शाळा पुन्हा नव्याने सुरु करणाऱ्या संस्थाचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

दिवा (जि.ठाणे) येथे ४४ अनधिकृत शाळा सुरु असून, बेकायदेशीर शाळांवर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांकडून प्रशासकीय व फौजदारी कारवाई सुरु आहे.

मात्र, पुन्हा बंद केलेल्या शाळा प्रशासनाकडून नाव बदलून नव्याने शाळा सुरु करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शसनास आले हे खरे नाही.
(२) अनधिकृत शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये, यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती होणेसाठी दिनांक २८ जानेवारी, २०२५ व दिनांक २५ एप्रिल,२०२५ रोजी तसेच स्थानिक वृत्तापत्रामध्ये वेळोवेळी अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द करण्यात आले आहे. माहे जून महिन्यात दिवा स्टेशन परिसरात व दिव्यातील रहदारीच्या ठिकाणी अनधिकृत शाळांची यादी फ्लेक्सद्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे.
(३) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १९ जून,२०१० व दिनांक १० नोव्हेंबर, २०२० द्वारे बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कलम १८ (५) मधील तरतुदीनुसार

शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरु असणाऱ्या शाळांविरुध्द कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील अनधिकृत शाळांवर दंड आकारणे, फौजदारी गुन्हा दाखल करणे व कायमस्वरुपी शाळा बंद करण्याची कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १८ डिसेंबर, २०२३ नुसार जिल्ह्यात अनधिकृत शाळा सुरु झाल्यास संबंधित शिक्षणाधिकारी यांच्यावर व्यक्तिगत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेकडून दिवा शहरातील अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) * ५६९८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षकांची २४७, तर मुख्याध्यापकांची ५७ पदे रिक्त असून हंगामी तत्त्वावर शिक्षक नेमल्याने हंगामी शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणा होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांमधील विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक व कर्मचाऱ्यांची पदे निश्चित करुन संचमान्यता घेणे बंधनकारक असून आरक्षणाबाबतची बिंदूनामावली (रोस्टर) मागासवर्गीय कक्षाकडून मंजूर करून घ्यावी लागते परंतु, शिक्षण विभागाकडून संचमान्यतेला स्थगिती दिल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांची संचमान्यता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांची पदे रिक्त असल्याने, जे शिक्षक कार्यरत आहेत त्यांच्यावर अधिक कामाचा भार येऊन पुरेसे शिक्षक नसल्यामुळे शाळांमध्ये ज्या विषयांसाठी विशेष शिक्षक आवश्यक आहेत, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेने पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीसाठी आवश्यक ती प्रक्रियाही पूर्ण केलेली नसून बहुसंख्य शाळांमध्ये शिक्षकच नाहीत, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, अपुऱ्या शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येऊ नये याकरीता पुणे महानगरपालिकेंतर्गत शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत २०२४-२५ च्या संचमान्यतेला स्थगिती उठविण्यात आलेली असून मंजूर संच मान्यतेनुसार बिंदुनामावली तयार करुन मागासवर्ग कक्ष पुणे विभाग यांच्याकडून तपासणी करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

(४) व (५) सद्य:स्थितीत २०२४-२५ च्या संचमान्यतेला स्थगिती उठविण्यात आलेली असून मंजूर संच मान्यतेनुसार बिंदुनामावली तयार करुन मागासवर्ग कक्षाकडून तपासणी करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून बिंदुनामावली तपासणीनंतर पवित्र प्रणाली मार्फत भरती करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार नगरपरिषदेच्या (जि.पालघर) मुख्याधिकारी यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३९)** * **५३०२ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी स्मशानभूमीत अंत्यसंस्काराकरीता लागणारे लाकूड नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता बंद केल्यामुळे तसेच खडखळ नळ पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होऊन संतप्त नागरिकांनी नगरपरिषदेच्या प्रशासनाविरोधात बुधवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास बाजारपेठेपासून शहर बंद पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जव्हार ही जुनी नगरपरिषद असून मिनी महाबळेश्वर संबोधले जाणारे हे शहर मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहिले आहे, जव्हार शहरात कचऱ्याची समस्या कायम असून, कचरा उचलण्याची कार्यक्षम व्यवस्था नसल्याने नागरिक, दुकानदार मोकळया जागेत कचरा टाकतात, त्यामुळे अद्ययावत कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने शासन कार्यवाही करणार आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांनी असुविधा निर्माण करणाऱ्या व जनतेच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी केली असून, शासनाने असुविधा निर्माण करणाऱ्या व जनतेच्या पैशाचा अपव्यय करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांच्या अनियमिततेची चौकशी करून फौजदारी कारवाई केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

जव्हार नगरपरिषदेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात स्मशानभूमीकरीता दहनासाठी जळावू इंजायली किटा पुरवठा करण्याच्या कामाचे कार्यादेश दिनांक १३/०६/२०२३ रोजी दिले. सदर ठेक्याची मुदत माहे जून, २०२४ मध्ये संपल्याने पुढील निविदा प्रक्रिया करण्याच्या कालावधीत नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेली लाकडे अंत्यसंस्कारासाठी नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आली. तद्नंतर नवीन दरपत्रक सूचना प्रसिध्द करुन दिनांक ०१/१०/२०२४ रोजी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला असून नागरिकांच्या मागणीनुसार अंत्यविधीसाठी लाकडे पुरविण्यात येत आहेत.

खडखड पाणीपुरवठा योजनेंतर्गत खडखड धरण ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाणीपुरवठा करणे तसेच जलशुध्दीकरण प्रकल्प, पाण्याच्या टाक्या व नळजोडणी इत्यादी कामे पूर्ण झाली असून सदर कामांचे त्रयस्थ एजन्सीमार्फत लेखापरिक्षण करण्यात आले आहे. लेखापररिक्षण अहवालानुसार कामे निकृष्ट दर्जाची नाहीत.
(२) व (३) जव्हार नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. १ ते ८ मधील कचरा संकलन करणे, वाहतूक करणे व रस्ते-नाले सफाई तसेच विविध कामे करणे या कामाचा ठेका सन २०२३ पासून तीन वर्षाच्या

कालावधीकरीता देण्यात आला आहे. दैनंदिन जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जव्हार सि.स.क्र.१५४२ व १५४३ मध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प केंद्र सन २०२१-२०२२ पासून कार्यान्वित आहे.

सदर घनकचरा प्रकल्पाव्दारे शहरात दैनंदिन ५ टन कचरा (१.५ ओला व ३.५ सुका) जमा होतो. यामधील १.५ टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याव्दारे कंपोस्ट खत तयार करण्यात येते. कंपोस्ट खताच्या विपणन व विक्रीसाठी राज्य शासनाचा "हरित-महासिटी कंपोस्ट" ब्रँण्ड वापरण्यास स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी यांचेमार्फत परवानगी प्राप्त झालेली आहे. तसेच सुका कचऱ्यामधील प्लास्टिक कचरा विलग करुन त्याचे मशिनव्दारे गठ्ठे तयार करण्यात येतात व सदर प्लास्टिक कचरा हा शासनाने नेमलेल्या कंपनीस देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील आगी विझविण्यासाठी बसविलेले फायर हायड्रंट कार्यान्वित करण्याबाबत

**(४०) * ५००४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात लागणाऱ्या आगी विझविण्यासाठी ब्रिटीशकाळात बसविलेले लाल रंगाचे फायर हायड्रंट (बंब) अतिक्रमणामुळे, प्रशासनिक दुर्लक्ष आणि देखभाल दुरुस्तीअभावी अथवा त्यांच्या जोडण्या बंद पडल्याने अग्निसुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधानसभेच्या लोकलेखा समितीने सन २०१९ मध्ये हायड्रंट पुनरुज्जीत करण्याची शिफारस केली होती परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ मध्ये गरीब नगर, बांद्रा, सन २०१२ मध्ये मंत्रालयात, सन २०१४ मध्ये लोटस नीलकमल, अंधेरी आणि सन २०२१ मध्ये भांडुप ड्रीम मॉलमध्ये आगीच्या वेळी पाण्याचे टँकर वेळेत न आल्याने हायड्रंटचा वापर करता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात टॉवर उभे होत असताना हायड्रंटचा वापर, दुरुस्ती व त्यांना पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहर व उपनगरात एकूण १०४७० हायड्रंट असून त्यापैकी ११३१ हायड्रंट कार्यरत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागामार्फत सर्व फायर हायड्रंट आवश्यकतेप्रमाणे दुरूस्ती करून नियमितपणे कार्यन्वित करण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

मुंबई शहर व उपनगरात एकूण ११३१ फायर हायड्रंट कार्यरत आहेत.

(३) हे खरे नाही.

या घटनांमध्ये फायर इंजिन टॅंकर, जम्बो वॉटर टॅंकर, स्टॅटीक टॅंकर व परिसरातील हायड्रंटचा पाण्याचा वापर करून आग विझविण्यात आली.

(४) मुंबई शहर व उपनगरामध्ये नवीन इमारतीचा आराखडा मंजूर करताना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना कायदा अधिनियम २००६, विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली २०३४ अनुसार इमारतीमध्ये आवश्यक क्षमतेच्या साठ्यासाठी अंडरग्राउंड टॅंक, ओवर हेड टॅंक बाधणी, हायड्रंट व स्पिंकलर यंत्रणा, रायझर सिस्टीम आणि फायर फायटींग पंप बसविणे आवश्यक आहे. मुंबई शहर व उपनगरात एकूण ११३१ फायर हायड्रंट व ६१ टॅंकर्स भरणा केंद्र कार्यन्वित आहे. नवीन जलवाहिनी कार्यन्वित करताना सुद्धा फायर हायड्रंटची उभारणी करण्यात येते. सद्य:स्थितीत अभियंता (जलकामे) विभाग व मुंबई अग्निशमन दल अधिकारी यांच्या समन्वयाने संयुक्त तपासणी करून आगीच्या परिस्थितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २४ तास पाणी उपलब्ध करण्याकरीता एकूण २६ पाणी भरणा केंद्र महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कोल्ड्रिफ सिरपच्या सेवनाने बालकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(४१) * ४६८६ श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये कोल्ड्रिफ सिरप या औषधाच्या सेवनाने १४ बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर राज्यातील नागपूरमध्ये उक्त सिरपच्या सेवनामुळे उपचार घेत असलेल्या १९ बालकांचा तसेच पिंपळखुटी (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील ६ वर्षीय बालकाचा सर्दी खोकल्याचे औषध घेतल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मृत्यू झाल्याच्या घटना माहे ऑक्टोंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनांनंतर अन्न व औषध प्रशासनाकडून तात्काळ कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक एसआर -१३ च्या वापरास आणि विक्रीस बंदी घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्ड्रिफ सिरपमध्ये “डायथिलीन ग्लायकॉल “नावाचा विषारी पदार्थ मिसळण्यात आल्याने अन्न व औषध प्रशासनाने संबंधित रुग्णालयांतील औषधांच्या दुकानातून पाच औषधांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले असून सदरहू नमुन्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यात काय नमूद करण्यात आले आहे,

(४) असल्यास, बालकांचे कफ सिरपने होत असलेले मृत्यू रोखण्याबाबत तसेच सदर हानिकारक सिरप तयार करणाऱ्या कंपनींची तसेच उक्त सिरप दुकानात ठेवणाऱ्या दुकानदारांची चौकशी करून बालकांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३) व (४) Sresan Pharma या तामिळनाडू येथे स्थित उत्पादकाकडून COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या औषधाचा पुरवठा मध्यप्रदेश राज्यात करण्यात आला होता. सदर औषधामुळे मध्यप्रदेश राज्यातील बाधित मुले नागपूर येथे उपचारासाठी दाखल झाली होती. तद्नंतर मध्य प्रदेशमधील सदर मुलांचा दूषित कफ सिरप या औषधाचे सेवन केल्यामुळे नागपूर येथे मृत्यू झाला होता. महाराष्ट्र राज्यामध्ये COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या औषधाचा पुरवठा झाला नसल्याचे औषध नियंत्रक, तामिळनाडू यांच्याकडून कळविण्यात आले होते. तथापि, अन्न व औषध प्रशासनाकडून पूर्वखबरदारी म्हणून कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक एसआर-१३ च्या अनुषंगाने दिनांक ०५/१०/२०२५ व दिनांक ०७/१०/२०२५ रोजी Public Alert जारी करून सदर औषधाचा वापर व विक्री न करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील पिंपळखुटी (ता.कळंब) येथील ०६ वर्षीय बालकाचा सर्दी खोकल्याचे औषध घेतल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर मध्ये निदर्शनास आली. तपासानुसार सदर रुग्णाने तारक हॉस्पीटल, यवतमाळ येथे उपचार घेतले असून, रुग्णास साई मेडिकल, यवतमाळ येथील औषधे डॉक्टरांच्या चिठठीद्वारे देण्यात आली होती. रुग्णाने सेवन केलेल्या औषधांचे नमुने अन्न व औषध प्रशासनाने चाचणी व विश्लेषणाकरीता घेऊन शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविले होते. सदर विश्लेषण अहवालानुसार औषधामध्ये Diethylene Glycol व Ethylene Glycol या विषारी घटकांचे मिश्रण नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, यवतमाळ जिल्ह्यातील पिंपळखुटी (ता.कळंब) येथील ०६ वर्षीय बालकांचा मृत्यू सर्दी खोकल्याचे औषध घेतल्यानंतर झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यात उत्पादित होत असलेल्या कफ सिरप व त्यासाठी वापरण्यात येणारे liquid excipient यांचा दर्जा पडताळण्यासाठी तपासणी मोहीम राबविण्यात आली आहे. त्यानुसार, ७९ उत्पादकांच्या तपासण्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यामध्ये उत्पादकांद्वारा औद्योगिक दर्जाचे liquid excipients वापरले जात नसून ते फार्माकोपियल दर्जाचे वापरले जात असल्याचे आढळून आले. इतर त्रुटींसाठी ०९ उत्पादकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. उत्पादकांकडून एकूण ३२ नमुने चाचणीसाठी घेण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील शासकीय कर्मचारी वसाहतीच्या पुनर्विकास योजनेंतर्गत मालकी हक्काने घरे मिळण्याच्या मागणीबाबत

**(४२) * ५२०९ ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे येथील शासकीय वसाहतीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय कर्मचाऱ्यांचे वास्तव्य असून, या वसाहतींचा पुनर्विकास करून, कर्मचाऱ्यांना माफक दरात मालकी हक्काने घरे उपलब्ध करून देण्यात यावीत अशी गत अनेक वर्षांपासून करण्यात येत असलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक वर्षापूर्वी समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीची अद्यापपर्यंत एकही बैठक झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुनर्विकासाचा मुख्य उद्देश शासकीय कर्मचाऱ्यांना माफक दरात मालकी हक्काने घरे उपलब्ध करून देणे असून, शासकीय वसाहतीत वास्तव्यास असणाऱ्या कर्मचाऱ्यांना याच ठिकाणी कायमस्वरुपी घर मिळावे अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचे काम वसाहतीतील भूखंडाबाबत आणि रहिवाशांच्या घरांसंबंधीचे निकष निश्चित करणे असून समितीच्या स्थापन झाल्यानंतर घेण्यात आलेल्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या मागणीसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दिनांक ०१/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वांद्रे शासकीय वसाहतीतील भुखंडाचा तपशिल अधिकारी/कर्मचारी/ कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांची अर्हता/निकष निश्चित करण्यासाठी व इतर निर्णय होण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून त्यानुसार मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०९/२०२५ रोजी समितीची बैठक पार पडली असून बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दिनांक ३०/१०/२०२५ रोजी इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय तपासणी करण्याबाबत

**(४३) * ६१६६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने व्हावी यासाठी नगरविकास विभागाकडून ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास ५ कोटीं रुपयांचा निधी देण्यात येईल अशी घोषणा मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांनी माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपचार करणे शक्य होते, आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, त्यामुळे या शिबिराकडे दुर्लक्ष न करता जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू निरोगी महिला अभियानातंर्गत ठाणे शहरात विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्याबाबत तसेच नगरविकास विभागाकडून रुपये ५ कोटी एवढ्या रकमेचा निधी उक्त

शिबिरासाठी खर्च करण्यासाठी प्रशासनामार्फत नियोजन अद्यापही करण्यात आले नसल्याने उक्त गंभीर आजारासंदर्भात प्रशासनाकडून जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने करण्यात येणार असून स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा विचार करता सदर अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध ठिकाणी शिबिरे आयोजित करुन प्राप्त झालेल्या रुपये ५ कोटी एवढ्या रकमेच्या निधीचे योग्य प्रकारे विनियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

उप मुख्यमंत्री निरोगी महिला अभियाना अंतर्गत ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी नियोजनबध्द पध्दतीने महिलांकरीता आरोग्य शिबीरे राबविण्यात येत आहेत.

(४)• ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ६ प्रसूतिगृह, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे महिलांची तज्ञांमार्फत आरोग्य तपासणी केली जाते व विविध ठिकाणी आरोग्य शिबीरांचे आयोजन केले जाते. आशा कार्यकर्त्यांमार्फत घरोघरी जाऊन महिलांना व मुलींना शिबीरांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या शिबीरांमध्ये स्त्रीरोग तज्ञांमार्फत गर्भाशयाच्या कर्करोगाची तपासणी जसे की पॅप स्मीअर करण्यात येते. ज्या महिलांना कर्कराग सदृश्य लक्षणे आढळल्यास त्यांना पुढील तपासणी व उपचाराकरीता छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे संदर्भीत केले जाते.

• ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयोजित विविध शिबीरांमध्ये आजपर्यंत एकूण १४९३ महिलांची पॅप स्मीअर व ७३९२ महिलांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिका अंतर्गत एप्रिल, २०२२ पासून मॅमोग्राफी व्हॅन कार्यरत आहे व त्याद्वारे कार्यक्षेत्रातील एकूण १३,५४२ महिलांची स्तन कर्करोग तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच, कार्यक्षेत्रातील महिलांना सामुदायिक बैठकीमध्ये तज्ञांमार्फत आरोग्य समुपदेशन करुन एकूण ११,३२९ महिलांमध्ये कर्करोगाबाबत जनजागृती केली.

• सदरचा कार्यक्रम/अभियान नगरविकास विभागाकडून प्राप्त निधीमधून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महानगरपालिकेकडून प्रदूषण नियंत्रण निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(४४) * ५८०८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरास केंद्र शासनाकडून प्रदूषण नियंत्रणासाठी प्राप्त झालेल्या निधीचा नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी वापर केला जात नसून चंद्रपूर शहरातील प्रदुषणामुळे नागरिकांमध्ये श्वासोच्छवासाचे आजार आणि इतर आरोग्य समस्या निर्माण झाल्या असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर महानगरपालिकेस सन २०२४-२०२५ साठी प्रदूषण नियंत्रणासाठी मिळालेल्या निधीतून रस्ता दुभाजक बनविण्यासाठी रुपये ३ कोटी ५६ लाख खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेवून सदरील निधीचा गैरवापर करुन नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधित महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

National Clean Air Programme (NCAP) GR/Guidelines अंतर्गत वृक्षारोपणासह दुभाजकाचे बांधकाम अनुज्ञेय असून चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे रुपये ३,५६,३८,०२०/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली आहे. याकरीता महानगरपालिकेने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदा प्रक्रिया पार पाडून कार्यारंभ आदेश दिला असून नियमानुसार काम सुरु आहे. सदर कामाचे अद्यापपर्यंत कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांमध्ये औषधांचा साठा उपलब्ध नसल्याबाबत

**(४५) * ५२७७ श्रीमती चित्रा वाघ, श्री.अमित गोरखे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत औषधांचा पुरवठा करण्यासाठी सन २०२२ पासून प्रलंबित असलेल्या औषध खरेदीच्या प्रस्तावास माहे जून, २०२५ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांमध्ये औषधांचा साठा न पोहोचल्याने रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालाड (मुंबई) मधील मालवणी हेल्थ पोस्ट–२ आणि मालवणी भूमी पार्क रुग्णालयात दीर्घ काळापासून आवश्यक औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे तसेच मधुमेह ग्रस्त रुग्णांना मेटफार्मिन गोळया व अँटीरेबीज वॅक्सिंग उपलब्ध न झाल्यामुळे गरीब गरजू रुग्णांना जवळच्या खाजगी मेडिकलमध्ये जाऊन औषधे खरेदी करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औषध वितरकांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत औषधांचा पुरवठा अद्याप न करण्याची कारणे काय आहेत, औषध वितरकांनी रुग्णांच्या आरोग्य सेवेसाठी वेळेत औषध पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या सर्व रुग्णांना महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते विभागामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या विविध अनुसुचीच्या दरपत्रकानुसार औषधांची खरेदी करून सदर औषधे मोफत उपलब्ध करून दिली जातात. तसेच ज्या औषधांच्या अनुसूचीचे दरपत्रक प्राप्त झाले नाही पण जी औषधे रुग्णांना वारंवार द्यावी लागतात अशी औषधे महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर या अधिकृत संकेतस्थळावर दरपत्रिका/ निविदा प्रसिध्द करुन महानगरपालिकेच्या विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून रुग्णांना मोफत उपलब्ध करुन दिली जातात.

(३) हे खरे नाही.

मुंबई मालाड मधील मालवणी हेल्थ पोस्ट-२ येथे येणाऱ्या मधुमेह ग्रस्त रुग्णांना मेटफार्मिन गोळ्या व अँटीरेबीज वॅक्सिंग मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. तथापि, मालवणी भूमी पार्क रूग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येत नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून औषध वितरकांना कार्यादेश देण्यात येतात. औषध पुरवठा करण्यास विलंब केल्यास निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे दंडात्मक कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेंतर्गत अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(४६) * ५०६७ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या नऊ प्रभागात ९०९ बांधकामे अनधिकृत असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये मा.उच्च न्यायालयास सादर केली असून, ९०९ बेकायदेशीर बांधकामांपैकी सर्वाधिक बांधकामे ही दिव्यात असून त्यापैकी १७५ बांधकामे पूर्णपणे व ४२ बांधकामे अंशत: निष्कासित केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाण्यात अनेक अनधिकृत बांधकामे असल्याचे निरीक्षण नोंदवीत महानगरपालिकेला बेकायदेशीर कामांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देशही मा.उच्च न्यायालयाने दिले असून त्यानुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे उभी राहण्यास मदत करणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व विकासकांवर तसेच सदरहू बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामे तात्काळ निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीत आजमितीस नऊ प्रभाग समिती कार्यक्षेत्रात नजिकच्या काळात झालेल्या व सुरु असलेल्या एकूण ९४२ अनधिकृत बांधकामापैकी २१० बांधकामे पूर्णतः व ७६ बांधकामे अंशतः निष्कासित करण्यात आलेली आहेत. तसेच ५३ बांधकामधारका विरुध्द MRTP ॲक्ट अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून दिनांक १४ जून, २०२५ ते दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ या कालावधीमध्ये महानगरपालिका हद्दीतील नऊ प्रभाग समिती कार्यक्षेत्रात नजिकच्या काळात झालेल्या व सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांचे तसेच ग्रीन झोन/ना-विकास क्षेत्रातील जमिनीमध्ये/झोनमध्ये झालेल्या बेकायदेशीर बांधकामांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिकेने सर्वे क्र. १७८, १७९ व १८० वरील १७ व त्याच परिसरातील अन्य ४ अशा एकूण २१ अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली असून सदरचे बांधकाम पूर्णतः जमीनदोस्त (Ground zero) करण्यात आलेले आहे. तसेच रिट याचिका क्र. ३०१०८/२०२२ या याचिकेत नमूद एकूण १० अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून सदरचे बांधकाम पूर्णतः जमीनदोस्त (Ground zero) करण्यात आलेले आहे. तसेच रिट याचिका क्र.७३५०/२०२५ या याचिकेत नमूद एका अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई ठाणे महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(३) दिवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई न केल्यामुळे, कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी मुख्याधिकारी संवर्गातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले तत्कालीन सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ अन्वये विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ च्या परि/०६/४ ते ६.८, दोषारोपपत्र प्रारुप (परिशिष्ट १ ते ४) नुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

तसेच, दिवा प्रभाग समिती येथील दोन तत्कालिन सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, तसेच विद्यमान एक बीट निरीक्षक व दोन बीट मुकादम यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाणेवाडी (ता.जि.जालना) येथील संत गाडगेबाबा जलाशयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७)** * **४८३६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाणेवाडी (ता.जि.जालना) येथील संत गाडगेबाबा जलाशयात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे जलाशयाची उपयुक्त साठवण क्षमता कमी झाली असून, जलाशयाच्या परिसरात अवैध मुरुम, वाळू उत्खनन व अतिक्रमण सुरु असल्याने जलाशयाच्या संपूर्ण प्रकल्पाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलाशयाच्या संरक्षक भिंतीवर झाडे-झुडूपे वाढलेली असून पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती सुरु असल्याने जलाशयास गंभीर धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जालना शहरास मुबलक पिण्याचे पाणी मिळावे याकरीता गाळ उपसा करुन जलाशयाची पाणी साठवणुकीची क्षमता वाढविण्याकरीता तसेच जलाशयाच्या मजबुतीकरण, संरक्षण व देखभाल दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

घाणेवाडी येथील संत गाडगेबाबा जलाशयात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे जलाशयाची उपयुक्त साठवण क्षमता १४ दश लक्ष घनमीटर वरुन १० दश लक्ष घनमीटर एवढी कमी झाली आहे.

तथापि, घाणेवाडी जलशयातून कुठल्याही प्रकारचे वाळू उत्खनन व या परिसरात अतिक्रमण सुरु असल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्याकडे जालना जिल्ह्यातील आपत्ती सौम्यीकरण उपाययोजना अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावामध्ये, घाणेवाडी धरणाचे मजबुतीकरण व सांडवा दुरुस्तीच्या रुपये ८,४६,१३,९११/- इतक्या किंमतीच्या कामाचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, जालना यांनी दिनांक ०८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांना देखील उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वजन कमी करण्यासाठीच्या इंजेक्शनची राजरोसपणे विक्री होत असल्याबाबत

**(४८) * ५१३४ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वजन कमी करण्यासाठी इंजेक्शनची राजरोसपणे विक्री सुरू असून, अशा इंजेक्शनच्या अतिरेक व अनियंत्रित वापरामुळे रुग्णांमध्ये मळमळ, उलट्या, अतिसार, स्नायूवेदना, रक्तदाबातील चढउतार, मानसिक ताणतणाव इत्यादी गंभीर दुष्परिणाम दिसून येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक रुग्णांना या दुष्परिणामामुळे तातडीने उपचार घेण्याची वेळ आली असून काहींचे आरोग्य धोक्यात आले असल्यामुळे अशा प्रकारच्या वजन घटवणाऱ्या इंजेक्शनच्या जाहिराती, प्रचार व विक्रीवर शासनाचे नियंत्रण ठेवून तसेच औषध प्रशासन विभागामार्फत तपासणी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) राज्यात वजन कमी करणाऱ्या इंजेक्शनची राजरोसपणे विक्री होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या दरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली नाही.

तथापि, मार्च, २०२५ मध्ये प्राप्त माहितीच्या आधारे Ozempic Injection हे वजन घटवण्यासाठी वापरण्यात येणारे औषध विनाआयात परवानगी व बेकायदेशीर मार्गाने प्राप्त करून त्यांची विक्री केल्याचे निदर्शनास आले असल्याने अन्न व औषध प्रशासनाने धाडी टाकून मे. एएसपीके इंटरनॅशनल ट्रेड, घाटकोपर, मुंबई, मे.बायोप्लस स्पेशालिटी, वडाळा, मुंबई तसेच, मे. विदर्भ फार्मा एलएलपी, गोवंडी, मुंबई या घाऊक विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहे. तसेच, या तीनही प्रकरणी प्रथम खबर अहवाल (FIR) नोंदविण्यात आले असून एकूण ०८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ मधील अनुसुची- J नुसार वजन कमी करण्यासाठीच्या औषधांच्या जाहिराती करण्यास प्रतिबंधीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना मानवविकास कार्यक्रमांतर्गत वाहतुकीसाठी बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * ५७९५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर, चोपडा, एरंडोल, चाळीसगांव, मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर (जि.जळगांव) या सात तालुक्यांतील मानवविकास निर्देशांक कमी असून या तालुक्यांतील शालेय विद्यार्थ्यांसाठी मानवविकास कार्यक्रमांतर्गत बसेस पुरविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानव विकास कार्यक्रमांतर्गत जळगांव जिल्ह्यातील उपरोक्त सात तालुक्यांतील शालेय विद्यार्थ्यांकरीता वाहतुकीसाठी किमान १०० बसेसची मागणी असताना अद्यापपर्यंत फक्त ४९ बसेस पुरविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक उंचाविण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांकरीता वाहतुकीची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता अतिरिक्त बसेस पुरविण्याची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) शासन निर्णय दिनांक १९ जुलै, २०११ व शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०१४ अन्वये मानव विकास कार्यक्रमांतर्गत जळगाव जिल्ह्यात अमळनेर, चोपडा, एरंडोल, चाळीसगाव, मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर या सात तालुक्यात शालेय विद्यार्थीनीकरीता बसेस पुरविण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्त्यांवरील खड्ड्यांच्या वाढत्या समस्येबाबत

**(५०) * ४९७० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना वाहतुकीदरम्यान उद्भवलेल्या समस्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून प्रवास धोकादायक ठरत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यापूर्वी सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांची कामे विहित वेळेत पूर्ण न करणाऱ्या तसेच रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी व रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांचा शोध घेऊन तातडीने बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय. हे,अंशत: खरे आहे.
(२) सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांचे एका संगमस्थानापासून दुसऱ्या संगमस्थानापर्यंत कॉक्रीटीकरण पूर्ण करून सदर रस्ते पावसाळयापुर्वी वाहतुकीसाठी सुरक्षित स्थितीत आणण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करून सदर रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत.रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आलेली नाही. रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होऊ नयेत यासाठी योग्य त्या उपाययोजना जसे की गुणवत्ता व्यवस्थापन कंपनी तसेच आय आय टी मुंबई प्रस्तावित करण्यात आलेली असून सिमेंट कॉँक्रीटीकरण पूर्ण झाल्यावर देखील कामाचा दर्जा तपासून खात्री करण्यात येते.
(३) महानगरपालिकेमार्फत रस्त्यांवरील खड्ड्यांचा शोध घेण्याकरीता २२७ प्रभागनिहाय रस्ते अभियंत्याची नेमणूक करण्यात आली आहे व त्यांच्यामार्फत स्वंयशोधन प्रणाली अंतर्गत तसेच Pothole quick fix या मोबाईल ॲप च्या माध्यमातून नागरीकांच्या तक्रारी नोंदविणे या पद्धतीचा अवलंब करून खड्डे भरण्यात आले आहेत. महानगरपालिकेमार्फत खड्ड्यांची दुरूस्ती विहित वेळेत करण्याकरीता प्रकल्प रस्ते सोडून इतर रस्त्यांकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली होती. तसेच प्रकल्प रत्यावरील खड्डे तत्सम प्रकल्प कंत्राटदारामार्फत विनामुल्य दुरूस्त करून घेण्यात आलेले आहेत. त्यांनुसार सर्व रस्ते पावसाळ्या दरम्यान वाहतुकीच्या दृष्टीने सुस्थितीत ठेवण्यात आलेले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवनार (मुंबई) येथील कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(५१) * ५३६२ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्री.अमित गोरखे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवनार (मुंबई) क्षेपणभूमीवर कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये कार्यान्वित होणार होता परंतु, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला आणखी नऊ महिन्यांची मुदतवाढ मिळून सदरचा प्रकल्प हा आता दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत कार्यान्वित करण्यात येणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणत्या समस्या उद्भवत आहेत, वीज निर्मितीचा या महत्वाकांक्षी प्रकल्पातून मुंबईतील कोणत्या भागाला अथवा नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या देवनार क्षेपणभूमी येथे सध्या वीस दशलक्ष मॅट्रिक टन कचरा जमा झाल्याने देवनार कचरा भूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले असतानाही उक्त प्रकल्प प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, देवनार येथे ६०० मेट्रीक टन प्रतिदिन क्षमतेच्या कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या देवनार क्षेपणभूमी येथे ६०० मे.टन प्रतिदिन क्षमतेच्या कचऱ्यापासून ०४ मेगावॅट इतक्या क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प प्रस्तावित होता. तथापि, वीजनिर्मिती क्षमता ०८ मेगावॅट पर्यंत वाढविणे शक्य असल्याचे निदर्शनास आले. त्यास अनुसरून वाढीव वीजनिर्मिती च्या प्रस्तावास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची सुधारीत मान्यता दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी प्राप्त झाली. तथापि, सुधारीत मान्यतेनुसार प्रस्तुत प्रकल्प दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदरहू प्रकल्पामुळे मानखुर्द, शिवाजीनगर तथा सभोवतालच्या परीसरातील नागरीकांना लाभ होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शक्तीपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध होत असल्याबाबत

**(५२) * ४८११ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सचिन अहिर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) या दरम्यान शक्तीपीठ महामार्गामुळे १२ जिल्ह्यांतील हजारो शेतकरी बाधित होत असून, उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विरोध डावलून शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेच्या निवडणूकीअगोदर हा महामार्ग रद्द करणार असे भाषणात जाहीर करुनही शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरू असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर ते गोवा या प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गात बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये जाहीर केले असून, शक्तिपीठ महामार्गासाठी पूर्वी ठरविण्यात आलेल्या जमिनींच्या संपादन प्रक्रिया रोखून नवीन मार्गासाठी पुनर्नियोजन करण्याचे आदेश देण्यात आल्यामुळे या प्रकल्पाच्या मार्गातील बदलामुळे जुना आराखडा रद्द करून नवीन सर्वेक्षण व तांत्रिक मोजणी सुरू करुन शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या मार्गात बदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे या मार्गातून कोल्हापूर जिल्हा वगळल्याचा स्थगिती आदेश रद्द करून रेखांकन बदलून कोल्हापुरातून महामार्ग करणार असल्याचे नवीन अधिसूचनेत स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) पर्यंतचा 'शक्तीपीठ' महामार्ग १२ जिल्हयांतून जाणार असून या महामार्गासाठी हजारो हेक्टर जिरायती जमीन संपादित केली जाणार असल्यामुळे सदर निर्णयाला शेतकऱ्यांचा तसेच कोल्हापूरसह इतर जिल्ह्यातील लोकांनी व लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) पर्यंतचा हा १२ जिल्ह्यातून जाणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याबाबत तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे या मार्गातून कोल्हापूर जिल्हा वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्हा वगळून महामार्गात समाविष्ट ३१० गावांपैकी १४४ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे व उर्वरित गावांची संयुक्त मोजणी प्रगतीपथावर आहे. संयुक्त मोजणीच्या प्रक्रियेत सहमती देणाऱ्या भूधारकांच्याच जमिनींची संयुक्त मोजणी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यामधील जमिनीची आखणी रद्द करण्यात आली आहे. तथापि, उर्वरित जिल्ह्यातील जमिनीच्या मोजणीसाठी व प्रकल्पात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शंका / प्रश्न जाणून घेण्याकरीता प्रकल्पाबाबत माहितगार संवादकांची नेमणूक करुन गावपातळीवर शासकीय अधिकाऱ्यांकडून बैठका / प्रबोधन शिबीर आयोजित करण्यात येत आहेत.

(३) व (४) कोल्हापूर व सिंधुदुर्ग वगळता शक्तीपीठ महामार्गाच्या मूळ मंजूर आखणीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्हयांमध्ये मूळ मंजूर आखणीसाठी पर्यायी आखणीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) व (६) सदर महामार्गासाठी १२ जिल्ह्यांपैकी कोल्हापूर जिल्हा वगळता उर्वरित ११ जिल्ह्यांमधील एकूण ३१० गावांमध्ये जमीन मोजणी करण्यासाठी काही प्रमाणात विरोध झाला हि वस्तुस्थिती आहे. तथापि, जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी व संवादक यांनी स्थानिक शेतकऱ्यांसमेवत चर्चा करून समन्वयाने दिनांक ०३/१२/२०२५ अखेर १४४ गावांतील जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे. सद्य:स्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यायी आखणी तेथील स्थानिक शेतकऱ्यांना व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच तयार करण्याची कार्यवाही सुरू असून, तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शहरातील बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याबाबत

**(५३) * ५१६१ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर, पूर्व व पश्चिम उपनगरात माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये ४ हजार ३२५ बेवारस वाहने निदर्शनास आली असून, सदर बेवारस वाहने ज्या ठिकाणी उभी केली जातात त्या ठिकाणी नीट साफसफाई करता येत नाही, वाहने कशीही उभी केल्यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीही होत असून त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेवारस वाहने रस्त्यावर अथवा सार्वजनिक जागेवर पार्किंग केली जात असल्यामुळे महानगरपालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास होत असून तेथील कचऱ्यामुळे रोगराई देखील पसरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास रस्त्यावरील बेवारस वाहने हटविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन पुढाकार घेऊन त्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने करीत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, मुंबईत ज्या-ज्या विभागात चटई क्षेत्रफळ निर्देशांकाचा (एफएसआय) वापर करून सार्वजनिक वाहनतळ बांधण्यात आले आहेत, अशा महानगरपालिकेच्या ताब्यातील वाहनतळांवरील २० टक्के जागा बेवारस गाड्यांसाठी राखून ठेवण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे, अंशत: खरे आहे.

मुंबई शहर, पूर्व व पश्चिम उपनगरात बेवारस वाहने ज्या ठिकाणी उभी केली जातात त्या ठिकाणी साफसफाई करताना अडचणी येतात परंतु महानगरपालिकेमार्फत वाहने हटविण्याची कारवाई संबंधित खात्यामार्फत करून त्याठिकाणी साफसफाई केली जाते.
(२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३१४ अन्वये नोटीस बजावून, ७२ तासांच्या कालावधीनंतर, सदर बेवारस वाहन रस्त्यावरून हटविण्यात येते व सदरहू वाहनांकरीता त्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीमध्ये वाहन मालकाने प्रतिसाद न दिल्यास सदर वाहनाची विल्हेवाट लावण्यात येते. रस्त्यावरील बेवारस वाहने हटविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पू.उप., प.उप. व शहर विभागाकरीता तीन स्वतंत्र कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून सुमारे ५०३६ बेवारस वाहने हटविण्यात आली आहेत.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांमार्फत बेवारस वाहन रस्त्यावरुन हटविल्यानंतर कंत्राटदाराने निश्चित केलेल्या मुंबई महानगर प्रदेश हद्दीतील जागेत ठेवण्याची अट निविदेमध्ये समाविष्ट आहे. यास्तव सदरहू वाहने हटविल्यानंतर कंत्राटदाराच्या जागेत ठेवण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा आजनसरा (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील संत भोजाजी महाराज देवस्थानापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत

**(५४)** * **५३८४ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा आजनसरा (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील MDR -४९ सीरसगाव ते आजनसरा संत भोजाजी महाराज देवस्थान पर्यंतचा रस्ता रुंदीकरणासह १२ कि.मी. करण्याकरीता निधी उपलब्ध करून देणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोजाजी महाराज देवस्थान येथे दर्शनाकरीता दररोज १० ते १५ हजार भाविक ये-जा करीत असून, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने रस्त्याचे रुंदीकरणासह त्या रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करण्याकरीता निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, दिनांक १२/१०/२०२५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सिरसगाव ते आजनसरा प्रजिमा ७४ रस्त्यावरील क्षतिग्रस्त झालेल्या रपटा (RCW) कि.मी.६/८०० चे काम पुल दुरस्तीचे कार्यक्रमातून करणे नियोजीत आहे. सद्या किरकोळ दुरुस्ती करुन वाहतूक सुरु करण्यात आली आहे. सिरसगाव ते आजनसरा या रस्त्याचे काम निधी निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## राज्यात सार्वजनिक ठिकाणी अवैधरित्या मद्यपानाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(५५) * ४६९४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मद्यावरील उत्पादन शुल्क वाढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर, परमीट रुममध्ये मद्यपानासाठी लागणारा दर वाढल्यामुळे ग्राहकांचे खुल्या मैदानावर मद्यपान सुरू असल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुल्या मैदानावर होणाऱ्या अवैध मद्यपानामुळे महिलांची सुरक्षा तसेच कायदा-सुव्यवस्था धोक्यात आली असून, अपघात व इतर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक व संघटनांकडून प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परमीट रुम व बार व्यावसायिकांकडून जुन्या साठ्यांवर अवास्तव दर आकारणे, तसेच परदेशी व भारतीय मद्यावरील वाढीव उत्पादन शुल्कामुळे बाजारात अवैध व बेकायदेशीर मद्यविक्री वाढल्याचे अहवाल शासनाकडे प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मद्यविक्री नियंत्रणासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत संयुक्त पथकाद्वारे कारवाई करण्यात आली आहे काय आणि त्यात किती गुन्हे नोंदविण्यात आले आहेत,

(५) असल्यास, खुल्या मैदानावर व सार्वजनिक ठिकाणी अवैधरित्या करण्यात येणारे मद्यपान व विक्री रोखण्यासाठी शासनाने दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

शासन महसूल वृद्धीबाबत शासन आदेश दिनांक २१ जुलै, २०२५ अन्वये मद्यावरील उत्पादन शुल्कात वाढ केल्याने तसेच परवाना कक्षात कमाल विक्री किंमत लागू नसल्याने, परवाना कक्षात मद्यपानासाठी लागणारा दर वाढलेला आहे. मात्र त्यामुळे ग्राहक खुल्या मैदानावर मद्यपान करतात यात तथ्य नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत खुल्या मैदानावर मद्यपानाबाबत राज्यात ७ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींवर कायदेशीर कारवाई करुन गुन्हे नोंद केले आहेत.

(२) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अवैध मद्यपानामुळे कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत असल्याबाबत एकूण ८ तक्रारी प्राप्त झाल्या असून अवैध मद्यपानामुळे महिलांच्या सुरक्षेबाबत एकूण १६ तक्रारी प्राप्त

झाल्या आहेत. तथापि, अवैध मद्यपानामुळे अपघात व इतर गुन्ह्यामध्ये वाढ होत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली नाही. अशा अवैध प्रकरणी प्राप्त तक्रारींवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे.

(३) परमीट रुम व बार (FL-३) अनुज्ञप्तीमध्ये मद्य विक्री करीता छापील कमाल विक्री किंमतीप्रमाणे दर आकारण्याबाबत कायदेशीर तरतूद नाही. मात्र, किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्तीमधून (FL-२, CL-३, FL/BR-२) मद्य विक्री होताना जुन्या दराच्या मद्यसाठ्याची वाढीव दराने विक्री झाल्याचे आढळून आले तर संबंधित अनुज्ञप्ती विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येते, त्यानुसार जुन्या साठ्यांवर वाढीव दर आकारल्याबाबत एकूण ५ प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, वाढ़ीव उत्पादन शुल्कामुळे बाजारात अवैध व बेकायदेशीर मद्य विक्रीबाबत २० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याबाबत कारवाई करण्यात आली आहे.

(४) अवैध मद्यविक्री नियंत्रणासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या संयुक्त पथकाद्वारे दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/१०/२०२५ या कालावधीत विविध जिल्ह्यात एकूण ६२ मोहिमा राबविण्यात आल्या असून त्याअंतर्गत एकूण ३८५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(५) पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभाग हे खुल्या मैदानावर व सार्वजनिक ठिकाणी अवैध मद्यपान व विक्री रोखण्यासाठी वेळोवेळी गस्त घालून तपासणी करतात. सदर तपासणीत काही आक्षेपार्ह आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत कार्यरत सफाई कामगारांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५६)** * **४७०६ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई शहर तसेच उपनगरात स्वच्छ भारत अभियान वा स्वच्छतेच्या विशेष मोहिमा राबविण्यात येतात, परंतु सफाई कामगारांना अपुऱ्या सुविधांमुळे नेहमीच जीव धोक्यात घालून काम करावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कामगारांना असलेल्या चौक्यांमध्ये सुविधांचा अभाव, कंत्राटी पध्दतीमुळे अस्थिर रोजगार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आवास योजना आणि आश्रय योजनांचा लाभ न मिळणे इ. अनेक समस्यांचा सफाई कामगारांना सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत नियमित स्वच्छता सेवा विशेष मोहिमांमध्ये सहभागी असलेल्या सफाई कामगारांना उद्‌भवत असलेल्या समस्यांचे निराकरण करुन त्यांच्या रास्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) विभागीय स्तरावर चौक्यांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, विश्रांती सुविधा उपलब्ध असून इतर सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम वेळोवेळी केले जाते. सफाई कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येतात. कंत्राटी कामगारांचे कामकाज विद्यमान कायदेशीर व कंत्राटीय अटींनुसार केले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आवास व आश्रय योजनांचा लाभ योग्य प्रक्रियेद्वारे देण्याची व त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येते.

(३) स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी असलेल्या सफाई कामगारांमार्फत त्यांच्या कामाच्या वेळेत मोहिम राबविली जाते व त्यांना वेळोवेळी भेडसवणाऱ्या समस्यांचे तात्काळ व प्राधाण्याने निराकरण करण्याबाबत महानगरपालिकेद्वारे कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मढ बेटावरील (मालाड) अनधिकृत बंगल्यांच्या बांधकामाची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याबाबत

**(५७) * ५३८८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमी अभिलेख विभागाच्या १९६७ च्या मूळ नकाशांच्या बोगस प्रती तयार करुन मढ आयलंड येथे नो-डेव्हलपमेंट झोन, सीआरझेड आणि एनए नियमांचे उल्लंघन करुन दुरुस्तीच्या नावाखाली धनाढ्यांनी नवीन बांधकामे केली असून, सदर कोट्यवधींचा गैरव्यवहार मुख्यतः दलाल, शासकीय कर्मचारी आणि कंत्राटदारांच्या संगनमताने केल्याचे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने नेमलेल्या विशेष तपास पथकाच्या (SIT) तपासात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड येथील मढ बेटावर बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे बंगल्यांचे बांधकाम अवैधरित्या केले असून, त्या बांधकामांवरील कारवाई टाळल्या प्रकरणी विशेष तपास पथकाने (एसआयटी) चौकशी सुरु केली आहे काय,

(३) असल्यास, मालाड येथील मढ बेटावरील अवैधरित्या बंगल्यांचे बांधकाम प्रकरणी महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) महसूल विभागाद्वारे जमाबंदी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीच्या अहवालानुसार उप अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर कार्यालयाकडील एकूण ८८४ हद्द कायम मोजणी नकाशांची तपासणी केली असता त्यापैकी १६५ हद्द कायम मोजणी नकाशामध्ये बनावटीकरण करुन ते अभिलेखात समाविष्ठ करण्यात आले असल्याचे आढळून आले आहे. यास्तव सदर प्रकरणाबाबत महसूल विभागाद्वारे गोरेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८२/२०२०, गु.र.क्र. ९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ आणि खेरवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४९०/२०२१ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल CRIMINAL WRIT PETITION (ST) NO. १३५५२ OF २०२४ या याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी

दिनांक २३/१०/२०२४ रोजी अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणेबाबत निर्देश दिले आहेत. यानुषंगाने गृह विभागाद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट २३ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगरपालिकेस अधिकार देण्याबाबत

**(५८) * ५८३४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगरपालिकेस अधिकार देण्याची मागणी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी नगरविकास विभागाकडे केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी यापूर्वी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विकास आराखडा रद्द झाल्यामुळे नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगरपालिकेस अधिकार देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय. पुणे महानगरपालिकेचे पत्र क्र.१६४, दिनांक ०३/०९/२०२५ अन्वये पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट २३ गावांकरीता पुणे महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून संपूर्ण अधिकार प्राप्त होण्याबाबत शासनास विनंती केलेली आहे.
(२) होय, पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी यापूर्वी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक १४/०७/२०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेली आहे.
(३) होय, पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाऐवजी पुणे महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण नियुक्त करण्याबाबत मा.श्री.अजित पवार, उपमुख्यमंत्री महोदय यांनी, मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १६/०९/२०२५ रोजी निवेदन दिलेले आहे.
(४) पुणे महानगरपालिकेच्या विनंतीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाऐवजी पुणे महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण नियुक्त करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू असून लवकरच याबाबत निर्णय घेण्यात येईल.
(५) विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील पदपथावरील अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(५९) * ५०३४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पदपथावरील अतिक्रमणे हटवून हे पदपथ वयोवृध्द तसेच अपंगांसह सर्वसामान्य पादचाऱ्यांना चालण्यायोग्य करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये मेट्रो लाईनच्या स्थानकांची कामे प्रगतीपथावर असून याठिकाणी नागरिकांसाठी पदपथ अस्तित्वात नसून मुंबईतील पदपथांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्याचे आदेशही दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदपथांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करुन पदपथांवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मेट्रो प्रवाशांना मेट्रोस्थानकांपर्यंत सुलभरित्या पोहोचमार्ग सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने प्राधिकरणामार्फत मेट्रोस्थानकांतर्गत पदपथांची सुधारणा तसेच निर्मिती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मेट्रो मार्ग क्रमांक २ ब, ४, ५, ६, ७ अ, ९ इत्यादी मार्गाच्या मेट्रोस्थानकामध्ये पदपथांची सुधारणा तसेच निर्मिती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबईतील पदपथावरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्याचे आदेश महानगरपालिकेने दिले आहेत.

(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येणारी कारवाई प्रभाविपणे होण्याबाबत व केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक आढावा घेण्याबाबत मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे या क्षेत्रांसाठी संबंधित अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/१०/२०२५ रोजी तीन विशेष समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भांडुप (पूर्व) येथील हेमा पार्क सोसायटीमधील रहिवाशांची विकासकाने फसवणूक केल्याबाबत

**(६०) * ४७९० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, भांडुप (पूर्व) येथील हेमा पार्क सोसायटीमधील रहिवाशांसोबत केलेल्या करारनाम्यामध्ये घराच्या मंजूर आराखड्यात चुकीच्या क्षेत्रफळांची नोंद करून लक्ष्मी कॉर्पोरेशन या विकासकाने त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांकडे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हेमा पार्क सोसायटीमधील रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, भांडुप (पूर्व) येथील हेमा पार्क सोसायटीमधील रहिवाश्यांसोबत केलेल्या करारनाम्यामध्ये घराच्या मंजूर आराखड्यात चुकीच्या क्षेत्रफळांची नोंद करून लक्ष्मी कॉर्पोरेशन या विकासकाने त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजीचे वा त्यासुमारासचे लेखी निवेदन मा.उपमुख्यमंत्री, गृहनिर्माण यांचे कार्यालय, मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे कार्यालय तसेच गृहनिर्माण विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेतील विविध पदांवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नती प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(६१) * ५१९८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेने विविध पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचारी आणि अधिकारी यांना चुकीच्या पध्दतीने पदोन्नती देण्यात येऊन सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २५ सप्टेंबर,२०२५ रोजी विविध पदांच्या काढण्यात आलेल्या पदोन्नती आदेशात अनियमितता झाली असून महानगरपालिका प्रशासनाने शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वांची पदोन्नती प्रक्रियेत अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२५ मधील पदोन्नती दिलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांची पूर्वीची पदोन्नती नियमित केलेली नसतानाही त्यांना पुन्हा तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिलेली असून, पदोन्नती प्रकियेमध्ये नियमित निवड सूची प्रथम प्रसिध्द करुन तद्नंतर पदोन्नती आदेश पारित करण्यात आले असताना सन २०२५ मध्ये पदोन्नती आदेश पारित करणेपूर्वी नियमित निवड सूची अदयाप प्रसिध्द न करण्यामागची कारणे काय आहेत.
(३) असल्यास, दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या निवड सूचीमधील वायरमन पदाचे कर्मचारी वगळून सर्वेअर पदावरील कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षक (स्थापत्य) पदाचे पदोन्नती आदेश कोणतेही कारण न देता आजतागायत निर्गमित करण्यात आलेले नसल्याने सर्वेअर पदावरील कर्मचारी सन २०१९ मध्ये पात्र असून त्यांची निवडसूची असूनही आजतागायत पदोन्नतीपासून वंचित आहेत, तसेच पदोन्नती घेतलेल्या कर्मचाऱ्यांनी एनसीटीव्हीटी चे प्रमाणपत्र कल्याण -डोंबविली महानगरपालिकेस सादर केले आहे काय,
(४) असल्यास, पदोन्नती देण्याकरीता शासन विहित मार्गदर्शक तत्वांचा अवलंब न करता चुकीची प्रक्रिया राबवित असून त्यानुसार कर्मचाऱ्यांना दिलेली पदोन्नती आणि अनियमिततेबाबत सखोल चौकशी करुन दोषी असणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

चौकशीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याचे निर्देश असल्याने सर्व पदोन्नती सदर निर्देशानुसार करण्यात येत आहेत.

सन २०२४-२५ या वर्षाच्या निवडसूचीसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गातील पदोन्नती कोटयातील सर्व पदांच्या रिक्त पदांसाठी दिनांक १८/०८/२०२५ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झालेली आहे. सदर बैठकीमध्ये विविध संवर्गातील अधिकारी आणि कर्मचारी यांना दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वानुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे. वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गाचे पदोन्नतीसाठी पात्र उमेदवार यांची एकत्रित निवडसूची विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकी पूर्वी तयार करून समितीने सदर निवडसूचीस मान्यता देऊन शिफारस केली होती. तथापि, कार्यकारी अभियंता या संवर्गातील निवडसूचीबाबत आक्षेप प्राप्त झाल्याने आणि निवडसूची ही सर्व संवर्गाची एकत्रित असल्याने कार्यकारी अभियंता संवर्गातील निवडसूची अंतिम झाल्यानंतर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

दिनांक २ मार्च, २०१९ रोजीची निवड सूचीमधील पदोन्नतीसाठी पात्र केलेल्या कर्मचाऱ्यापैकी दिनांक २८/०५/२०१९ रोजीच्या झालेल्या चर्चेनुसार तत्कालीन आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी सर्व्हेअर व मुख्य बाजार निरीक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीने पदस्थापनेस तुर्त स्थगिती ठेवण्याबाबत निर्देश दिलेले होते. सबब, पर्यवेक्षक (स्थापत्य) पदाचे पदोन्नती आदेश व मुख्य बाजार निरीक्षक या पदावर पात्र कर्मचारी यांचे पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. "वायरमन" पदावरुन पर्यवेक्षक (विदयुत) या पदावर पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर पदोन्नत कर्मचाऱ्यांनी एनसीटीव्हीटीचे प्रमाणपत्र कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला सादर केले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सन २०२१ च्या मंजूर आकृतिबंध व सेवा प्रवेश नियमानुसार पर्यवेक्षक (स्थापत्य) हे पद व्यपगत करण्यात आले आहे. तसेच मुख्य बाजार निरीक्षक या पदाचे समायोजन करण्यात आल्याने सन २०२१ नंतरच्या पदोन्नत्यांमध्ये या दोन्ही पदांबाबत विचार झालेला नाही ही वस्तूस्थिती आहे.

(४) पदोन्नती प्रक्रीयेत कोणतीही अनियमितता झाली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली येथे मॅनहोल चेंबरमध्ये पडून तेरा वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याबाबत

**(६२) * ५२४३ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली येथे नाल्याचे झाकण उघडे असल्याने तेरा वर्षीय बालकाचा उघड्या मॅनहोल चेंबरमध्ये पडून दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उघडे गटार चेंबर (manhole chamber) यावर सुरक्षा ग्रील बसविण्याचे मा.मुंबई उच्च न्यायालयाने वारंवार आदेश देऊन सुद्धा सर्व गटारांवर त्याची अंमलबजावणी करण्यात महानगरपालिका, नगरपालिका, एमएमआरडीए रिजन आणि बांधकाम विभाग अपयशी ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि एमएमआरडीए अधिकाऱ्यांवर शासनाने कडक कारवाई करुन सदर बालकाच्या कुटुंबियांना मदत देण्याच्या दृष्टीने तसेच उघडे गटार चेंबर (manhole chamber) बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कु.आयुष एकनाथ कदम, वय वर्षे १३, राहणार डोंबिवली (प.) याचा मृत्यू मॅनहोल चेंबर्समध्ये पडून झालेला नसून, त्याचा मृत्यू दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ रोजी रात्री ९.३० च्या सुमारास भरत भोईर नाल्यावरील उघड्या चेंबरमध्ये पडून झालेला आहे.
(२) हे खरे नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील उघड्या गटार चेंबर (Manhole Chamber) यावर सुरक्षा ग्रील बसविण्याचे तसेच, उघड्या गटारांवर कव्हर्स बसविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत केले जाते.
(३) बालकाच्या कुटुंबियांना मदत करण्याच्या दृष्टीने सदरचे आकस्मित मृत्यू प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई सुमोटो याचिका क्र.७१/२०१३ मधील आदेशानुसार गठित केले असून याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

महानगरपालिकेमार्फत प्रभागनिहाय चेंबर दुरूस्ती व कव्हर्स बदलणे यासाठी वार्षिक निविदा मागवून प्रभाग निहाय मक्तेदार नियुक्त केलेले आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत निदर्शनास येणाऱ्या प्रत्येक नादुरूस्त मॅनहोल चेंबर्सची दुरूस्ती संबंधित मक्तेदारामार्फत त्वरीत करुन घेतली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६३) * ५०६८ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त व काही अधिकाऱ्यांनी वसई-विरार परिसरात मलनिस्सारण आणि डंम्पिंग ग्राऊंडसाठी राखीव असलेल्या ६० एकर भूखंडावर बांधण्यात आलेल्या ४१ अनधिकृत इमारती प्रकरणी व अन्य विकासकामांमध्ये कोटयवधी रकमेचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींना अटक करुन त्यांच्याकडून रुपये ९ कोटी एवढी रक्कम, २४ कोटी रुपयांचे हिरे, सोने व रुपये १४ कोटी चे शेअर्स व अन्य कागदपत्रे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये जमा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित माजी आयुक्त व अधिकारी यांच्या गैरव्यवहाराबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी प्राप्त होऊनही शासनाने या तक्रारीकडे दुर्लक्ष केले असून या सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या शासन सेवा कालावधीत केलेल्या अनियमिततेची गंभीर दखल घेऊन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

(२) हे खरे आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांबाबत दिनांक १४ मे, २०२५ व दिनांक १५ मे, २०२५ व दिनांक ०३ जून, २०२५ रोजी Prevention of Money Laundering Act २००२ च्या तरतुदींनुसार अंमलबजावणी संचालनालय (ED) यांनी घेतलेल्या शोध मोहिमेमध्ये श्री.वाय. एस. रेड्डी, तत्कालीन उपसंचालक नगररचना यांच्या घरातून रुपये ८.२३ कोटी रोख रक्कम आणि रुपये २३.२५ कोटी किंमतीचे दागिने जप्त करण्यात आल्याचे दिनांक २७ जून, २०२५ च्या पत्रान्वये उपसंचालक, अंमलबजावणी संचालनालय यांनी कळविले आहे.
(३) वसई विरार शहर महानगरपालिकेतील श्री.वाय. एस. रेड्डी, तत्कालीन उपसंचालक नगर रचना यांना Prevention of Money Laundering Act २००२ च्या कलम १९ अन्वये दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी अटक केली आहे. अंमलबजावणी संचालनालयाने घेतलेल्या शोध मोहिमेत श्री.रेड्डी यांच्या घरी छापा टाकून रुपये ८.२३ कोटी रोख रक्कम आणि रुपये २३.२५ कोटी किंमतीचे दागिने जप्त करण्यात आल्याचे वृत्त अनेक सोशल मिडीया वृत्तपत्र इ. मध्ये प्रसिध्द झाल्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झाल्याने त्यांना दिनांक १९ मे, २०२५ पासून ते महानगरपालिकेचे कर्मचारी असल्याने महानगरपालिका स्तरावरून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे. तसेच, श्री.अनिलकुमार पवार (भा.प्र.से.) तत्कालीन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना Prevention of Money Laundering Act २००२ च्या कलम १९ अन्वये दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली असल्याने त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ च्या आदेशान्वये दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ पासून निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगांव, ताडवाडी (मुंबई) येथील बी.आय. टी. इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(६४)** * **४९८९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माझगांव, ताडवाडी (मुंबई) येथील बी.आय.टी इमारतीचा पुनर्विकास गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असून पिढ्यांपिढ्या वास्तव्यास असलेल्या रहिवाशांनी सन २००५ मध्ये माझगांव ताडवाडी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करुन विकासकाची नियुक्ती केली परंतु सन २०१८ पर्यंत प्रत्यक्षात पुनर्विकासास सुरुवात न झाल्याने महानगरपालिकेने विकासकाची नियुक्ती रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माझगांव, ताडवाडी (मुंबई) येथील बी.आय.टी. इमारतीच्या पुनर्विकासासाठी विहित निविदा प्रक्रियेद्वारे विकासक मे.वाय. एम. ॲण्ड मॅकवाईज एलएलपी यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर कामाबरोबरच लव्हलेन बी.आय. टी चाळीचा पुर्नविकास करण्याचा शासनाचा मानस असून सदर पुनर्विकासाचे काम कधीपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे व सदर प्रकल्पास किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, माझगाव ताडवाडी चाळींच्या पुनर्विकाससंदर्भात संबंधित विभागासोबत अनेकवेळा केलेल्या बैठका, चर्चा, प्रत्यक्ष पहाणी, पत्रव्यवहार केला असून त्यानुषंगाने शासनामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, शासनाने सदर चाळीच्या पुनर्विकासाचा प्रश्न गांभीर्याने घेऊन बी.डी.डी. चाळी व काळाचौकी चाळी या धर्तीवर या बी.आय.टी इमारतीच्या पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुनर्विकासातील इमारती दुरुस्त करण्याकरीता विकासकाने असमर्थतता दर्शविल्याने महापालिकेच्या स्तरावर दिनांक ०३ मे,२०१८ रोजी इरादापत्र रद्द करण्यात आले होते.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०१ मे, २०२३ रोजीच्या आदेशानुसार भुखंडाच्या पुर्नविकासासाठी मे.वाय.एम.ॲण्ड मॅकवाईज एलएलपी यांची नियुक्ती महानगरपालिकेद्वारे करण्यात आली आहे. लव्हलेन बी आय टी चाळीचा पुनर्विकास करण्याबाबत कुठलाही प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.
(४) बीआयटी चाळीच्या पुनर्विकासाबाबत कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कंत्राटदाराने वित्तीय देयक न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(६५) * ५१३७ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून राज्यातील विविध विकासकामांच्या निधीमध्ये कपात करण्यात आल्यामुळे सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व इतर विभागांतील कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची देयके दीड वर्षांपासून थकीत असून सांगली जिल्ह्यातील शासकीय कामावरील ठेकेदाराने माहे जुलै, २०२५ मध्ये तर नागपूर शहरातील राजनगर परिसरातील एका ठेकेदाराने शासनाकडून देयके न मिळाल्याने आर्थिक विवंचनेतून माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये आत्महत्या केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.एस.आर.डी.सी., एम.एस.आर.टी.सी., जलसंपदा विभाग, पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग व इतर अनेक विभागांमध्ये वेगवेगळी विकासकामे करणारे कंत्राटदार व कंपन्यांची रुपये ८७ हजार कोटींची देयके थकीत असून एका कंत्राटदाराने वित्तीय देयक शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे निराशेपोटी आत्महत्या केली असून सदर देयके किती कालावधीत शासन अदा करणार आहे व यासंबंधी शासन श्वेतपत्रिका जाहीर करणार आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभागाकडून राज्यभरातील कंत्राटदारांचे सुमारे रुपये ८९,००० कोटींची देयके थकीत असून, सदर देयके त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, थकीत देयकांमुळे अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असून, देयके अदा न झाल्यामुळे ठेकेदार अडचणीत आले असून इतकी मोठी थकबाकी निर्माण होण्यामागील वित्तीय नियोजनातील त्रुटी असल्यास त्यांची पूर्तता करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) राज्य शासनाकडून राज्यातील विविध विकासकामांच्या निधीमध्ये कपात करण्याबाबतचा निर्णय घेतलेला नाही.

सांगली जिल्हयातील आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीस शासनाने कोणतेही कामाचे कंत्राट दिलेले नाही. तसेच नागपूर जिल्हयातील आत्महत्या करणाऱ्या कंत्राटदाराचे रु.८८.७४ लक्षचे दि.२७.०८.२०२५ रोजी विभागीय कार्यालयात सादर केलेले देयक दि.१२.११.२०२५ रोजी अदा करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्नात नमूद राज्यातील पायाभूत सुविधा विकासकामांशी सबंधित सार्वजनिक बांधकाम, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, जलसंपदा व सार्वजनिक आरोग्य या विभागांतर्गत रु.३२७६० कोटीची देयके प्राप्त आहेत. सदर देयके विद्यमान मंजूर तसेच विहित मार्गाने आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पीत करून टप्प्याटप्प्याने अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) निधीअभावी कोणत्याही प्रकल्पाचे काम ठप्प पडल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

भांडवल निर्मिती प्रक्रियेमध्ये देयकांची निर्मिती व त्यांची अदायगी ही शासनस्तरावर निरंतर चालणारी प्रक्रिया असून निर्माण झालेली देयके अदा करण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अटल सेतूवर मोठे खड्डे पडून रस्ता खचल्याबाबत

**(६६) * ५१६६ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल सेतूवर केवळ अठरा महिन्यांत दोन किलोमीटर अंतराच्या भागात मोठे खड्डे पडले असून अटल सेतूवर जाणारा शिवडीतील रस्ता २० फूट लांब खचल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट या यंत्रणांतील समन्वयाच्या अभावामुळे हे घडल्यामुळे नागरिक, वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत

असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) अटल सेतूच्या कंत्राटदारावर एक कोटी रुपयांचा दंड आकारला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अटल सेतूवरील सर्व खड्डे तात्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

अटल सेतूच्या खाली असलेल्या मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्याच्या खालून मध्य भागातून जात असलेला नाला खचल्याचे तसेच अटल सेतूच्या पॅकेज-२ मध्ये सुमारे दोन किलोमिटर अंतरात काही ठिकाणी पावसाळ्यात खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे.
(२), (३) व (४) अटल सेतूच्या खाली मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या अखत्यारीतील रस्त्याच्या खालून मध्य भागातून जात असलेला नाला खचल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळपाहणी करून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सदर रस्त्याखालून जात असलेला नाला दुरूस्तीचे आणि रस्त्याचे काम त्वरेने हाती घेण्यात आले आहे.

अटल सेतूच्या पॅकेज-२ मधील कामाचे कंत्राट हे दोषदायित्व कालावधीत असल्याने संबंधित कंत्राटदारास सदर रस्त्याचे कंत्राटदाराच्या स्वखर्चाने पुनर्पृष्ठीकरण करण्याचे प्राधिकरणाद्वारे निर्देश देण्यात आले असून कंत्राटदाराद्वारे पुनर्पृष्ठीकरणाचे काम तातडीने हाती घेतले आहे. सदर काम आय.आय.टी., मुंबईच्या पेव्हमेंट तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली मिलींग, वॉटर प्रुफिंग आणि की-कोट, बेस कोर्स (लेअर-१), वेअरिंग कोर्स (लेअर-२), इत्यादी कामे तातडीने हाती घेण्यात आली आहे.

सदरच्या त्रुटींकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे संबंधित कंत्राटदारास रुपये एक कोटी व प्रकल्प सल्लागारास रुपये १० लाख रकमेचा दंड आकारण्यात आला आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.